सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

E-Mail : prajasattaknews24@gmail.com | RNI No. - MAHMAR 2023/84526 | Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ४ थे ❑ अंक - ३१ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ मंगळवार दि. २४ फेब्रुवारी २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते उद्याला शेगाव येथे राष्ट्रीय आरोग्य मेळावा - २०२६ चे उद्घाटन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४अमरावती** -भारत सरकारचे आयुष मंत्रालय, अखिल भारतीय आयुर्वेद महासंमेलन यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २५ ते २८ फेब्रुवारी २०२६ दरम्यान बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव येथे चार दिवसांचा राष्ट्रीय आरोग्य मेळावा २०२६ आयोजित करण्यात आला आहे.औषधी वनस्पती लागवड आणि कृषी वनीकरणाद्वारे आयुष औषध प्रणालींबाबत सर्वसामान्यांमध्ये जागरूकता निर्माण करणे , सर्वसमावेशक आरोग्य सेवा प्रदान करणे आणि शेतकऱ्यांसाठी उपजीविकेच्या नवीन संधी निर्माण करणे हे या मेळाव्याचे उद्दिष्ट आहे.राष्ट्रीय आरोग्य मेळावा- २०२६ चे उद्घाटन शुक्रवार २५ फेब्रुवारी २०२६ रोजी मा. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते होणार आहे. उद्घाटन समारंभ संत गजानन महाराज संस्थानच्या विसावा मैदानावर होणार आहे. उद्घाटन समारंभ महाराष्ट्राचे राज्यपाल आचार्य देवव्रत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुनेत्रा पवार व केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव आणि इतर अनेक मान्यवर पाहुण्यांच्या उपस्थितीत होणार आहे.या संपूर्ण मेळाव्यात नागरिकांना आयुर्वेद, योग आणि निसर्गोपचार, युनानी, सिद्ध, सोवा रिग्पा, होमिओपॅथी आणि इतर पारंपारीक आरोग्यसेवा शाखांसह विविध आयुष प्रणालीं मार्फत मोफत आरोग्य तपासणी, वैद्यकीय सल्ला आणि औषधे घेण्याची संधी मिळेल.आयुष क्षेत्रातील उत्कृष्ट उत्पादन पद्धती, गुणवत्ता मानके आणि अलीकडील संशोधन प्रदर्शित करण्यासाठी अनेक प्रतिष्ठित आयुष औषधनिर्माण आणि वेलनेस कंपन्या या मेळाव्यात सहभागी होणार आहेत. त्याचबरोबर दैनंदिन आरोग्य गरजांसाठी औषधी वनस्पती आणि साध्या घरगुती उपचारांचे समर्पित प्रदर्शन देखील या मेळाव्यात




भरवले जाणार आहे.बुलढाणा जिल्हा आणि आसपासच्या भागातील शेतकऱ्यांसाठी उत्पन्नाचा शाश्वत आणि लाभदायी स्रोत म्हणून कृषी वनीकरण आणि औषधी वनस्पतींची लागवड स्वीकारण्यास प्रोत्साहन देणारा एक विशेष उपक्रम यावेळी आयोजित करण्यात आला असून,तो या राष्ट्रीय आरोग्य मेळावा -२०२६ चे एक प्रमुख आकर्षण आहे. दि. २७ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी ३.०० वाजता शेगाव येथील विसावा परिसरात आयुर्वेदिक शेती, उत्पादन आणि विपणन या विषयावर विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.या महामेळाव्यात, शेतकऱ्यांना वनोत्पादनांवर आधारित आणि औषधी पिकांची लागवड, प्रक्रिया, मूल्यवर्धन आणि विपणन यावर तज्ज्ञांचे मार्गदर्शन मिळेल जेणेकरून पारंपारिक शेती करणाऱ्यांना आयुर्वेदिक शेतीसह ते करता येईल आणि त्यांच्या उत्पन्नात भर पडेल.केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांनी शेतकऱ्यांना आयुर्वेदिक शेती आणि उत्पादन कार्यक्रमात सक्रियपणे सहभागी होण्याचे आणि पारंपारिक पिकांसोबत औषधी वनस्पती लागवडीची क्षमता शोधण्याचे आवाहन केले आहे.शेतकऱ्यांनी त्यांच्या जमिनीचा काही भाग औषधी वनस्पतींसाठी राखून ठेवल्याने शेतकऱ्यांना शाश्वत आणि लाभदायी उत्पन्न मिळेल, तर नागरिकांना उच्च दर्जाचे नैसर्गिक उपचार पर्याय उपलब्ध होतील आणि आयुष मूल्य साखळी अधिक मजबूत होईल असे मत त्यांनी व्यक्त केले. महाराष्ट्र आणि शेजारील राज्यांमधील नागरिक, शेतकरी, बचत गट, विद्यार्थी, आरोग्य स्वयंसेवक आणि आयुष भागधारक यांनी शेगावला भेट देऊन राष्ट्रीय आरोग्य मेळावा २०२६ चा जास्तीत जास्त लाभ घ्यावा आणि या राष्ट्रीय कार्यक्रमाला यशस्वी करण्यासाठी सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात येत आहे.

## काळजाचा ठोका चुकला! उड्डाण करताच विमानाने घेतला पेट

### दिल्ली विमानतळावर तातडीने लँडिंग

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४नवी दिल्ली-** दिल्लीहून लेहच्या दिशेने झेपावलेल्या स्पाइसजेटच्या विमानात आज सकाळी उड्डाणानंतर काही वेळातच मृत्यूचा थरार पाहायला मिळाला. विमानाने हवेत झेप घेताच प्रवाशांना खिडकीबाहेर इंजिनमधून आगीच्या ज्वाळा आणि ठिणग्या दिसू लागल्या. या भयानक दृश्यामुळे प्रवाशांमध्ये मोठी घबराट पसरली. मात्र, वैमानिकाने प्रसंगावधान राखत विमान तातडीने पुन्हा दिल्ली विमानतळाच्या दिशेने वळवले आणि सुरक्षित लँडिंग केले. या मोठ्या संकटामुळे प्रवाशांचे प्राण थोडक्यात वाचले आहेत.

स्पाइसजेटचे हे विमान दिल्लीहून लेहसाठी नियोजित वेळेवर निघाले होते. विमानाने धावपट्टीवरून उड्डाण केल्यानंतर अवघ्या काही मिनिटांतच विमानातील तांत्रिक बिघाड समोर आला. 'क्लाईम्ब' अर्थात विमान उंची गाठत असतानाच्या दरम्यान विमानाचे दुसरे इंजिन निकामी झाल्याची शंका येत आहे. यावेळी इंजिनमधून ठिणग्या बाहेर पडताना दिसल्या, ज्यामुळे विमानातील प्रवाशांच्या मनात धडकी भरली.

विमानात आग दिसताच प्रवाशांनी आरडाओरड सुरू केली. अनेकांना विमानाचा भीषण अपघात होईल अशी भीती वाटू लागली. मात्र, क्रू मेंबर्सनी प्रवाशांना धीर देण्याचा प्रयत्न



केला. विमानातील या तांत्रिक बिघाडाची माहिती मिळताच दिल्ली विमानतळावर हाय अलर्ट जारी करण्यात आला आणि तातडीने आपत्कालीन लँडिंगची तयारी करण्यात आली.

सुदैवाने, वैमानिकाच्या कौशल्यामुळे विमान सुरक्षितपणे धावपट्टीवर उतरवण्यात आले. विमानात नेमके किती प्रवासी होते, याची अधिकृत आकडेवारी अद्याप समोर आलेली नाही. मात्र, सर्व प्रवाशांना सुरक्षित बाहेर काढण्यात आले असून त्यांची विमानतळावरच व्यवस्था करण्यात आली आहे. या घटनेचे गांभीर्य लक्षात घेता नागरी विमान वाहतूक संचालनालयाने या प्रकरणाच्या चौकशीचे आदेश दिले आहेत. तांत्रिक बिघाड नक्की कशामुळे झाला, याचे नेमके कारण सविस्तर तपासानंतरच स्पष्ट होईल.

## नक्षलमुक्तीची त्रिसूत्री, कॅडरसह केले फंडिंगवर प्रहार

### हजारो नक्षल्यांचे आत्मसमर्पण

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४नागपूर** -नक्षलमुक्त भारत मोहिमेच्या दिशेने सुरक्षायंत्रणांकडून वेगाने पावले टाकण्यात येत आहेत. संघटित प्रयत्नांतूनच घातक नक्षलवाद्यांचा खात्मा, हजारो नक्षल्यांचे आत्मसमर्पण शक्य झाले आहे. मात्र सुरक्षायंत्रणांनी केवळ नक्षल्यांना 'बुलेट 'नेच प्रत्युत्तर दिलेले नसून नियोजनबद्ध पद्धतीने त्यांच्या 'फंडिंग' वरदेखील प्रहार करत त्यांना गुडघे टेकण्यास भाग पाडले आहे. महाराष्ट्रासह छत्तीसगड, झारखंड येथील नक्षलवाद्यांच्या बालेकिल्ल्याला सुरुंग लागला असून सुरक्षायंत्रणांची कठोर कारवाई, आर्थिक नाकेबंदी आणि विकासकामांचा त्रिसूत्री फॉर्म्युला प्रभावी ठरत असून नक्षलवाद आता शेवटच्या टप्प्यात असल्याचे चित्र आहे.



सुरुवातीच्या काळात नक्षलवाद्यांना थेट चकमकींमधून 'बुलेट' ने प्रत्युत्तर दिले जात होते. मात्र अलीकडच्या काळात सुरक्षायंत्रणांनी अधिक व्यापक दृष्टिकोन स्वीकारत नक्षलवाद्यांच्या फंडिंग नेटवर्क, बेकायदेशीर खंडणी, जंगलातील अवैध व्यापार, वाहतूक आणि मध्यस्थ यंत्रणांवर नियोजनबद्ध कारवाया केल्या. आर्थिक स्रोत आटल्याने नक्षल गटांची हालचाल, भरती प्रक्रिया आणि शस्त्रसाठा मोठ्या प्रमाणात कमी झाला आहे. याचाच परिणाम म्हणून २०२५ पासून अडीच हजारांहून अधिक नक्षल्यांनी शरणागती पत्करली असून संघटनांमध्ये फूटही पडल्याचे दिसून आले. नक्षलविरोधी कारवाईसोबतच सरकारकडून विकासाची चाकेही वेगाने फिरवली जात आहेत. यामुळे आदिवासी व दुर्गम भागातील नागरिकांचा मुख्य प्रवाहाशी संपर्क वाढला आहे. शिक्षण, आरोग्य आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्याने स्थानिक तरुणांचा नक्षल चळवळीकडे ओढा कमी होत आहे. आत्मसमर्पण केलेल्या नक्षल्यांसाठी पुनर्वसन योजना व कौशल्य प्रशिक्षण राबविले जात असल्याने त्यांना नव्या आयुष्याची दिशा मिळत आहे.

नक्षलप्रभावित गावांमधील मुलांना शिक्षण घेऊन मुख्य प्रवाहात आणण्यासाठी 'एकलव्य मॉडेल' निवासी शाळांची योजना सुरू करण्यात आली होती. सद्यस्थितीत याअंतर्गत १७९ शाळा कार्यरत आहेत. तसेच तरुणांना स्वतःच्या पायावर उभे राहता यावे यासाठी ४६ आयटीआय व ४९ कौशल्य विकास केंद्रेदेखील उघडण्यात आली आहेत.

## फोन आला, लाखो पैसे उकळले गेले तर काय करावे?; CM फडणवीसांनी सांगितला मार्ग

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४ मुंबई-** डिजिटल अरेस्टविरोधात केंद्र सरकार आणि राज्य सरकार मोठ्या प्रमाणात जनजागृती करत आहेत. रिंगटोनवरही जाहिराती आहेत. तरीही रोज प्रत्येक दिवशी फसवणूक होत आहे. डिजिटल अरेस्ट हा निव्वळ खोटेपणा आहे. कोणालाही फोन आला तर थेट १९३० वर तक्रार करावी, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. महाराष्ट्राचे अर्थसंकल्पी अधिवेशन सुरू आहे. विधानसभेत डिजिटल अरेस्टबाबत समाजवादी पक्षाचे सदस्य आमदार अबू आझमी यांनी प्रश्न उपस्थित केला होता.

देशात डिजिटल अरेस्ट घटनांमध्ये झपाट्याने वाढ होत आहे. मोठ्या प्रमाणात लोक याला बळी पडत आहेत. त्यांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक होत आहे. या घटना टाळण्यासाठी राज्य सरकारने पावले उचलली पाहिजेत, जनजागृतीची व्याप्ती वाढवली पाहिजे, असे सांगत अबू आझमी यांनी याकडे लक्ष वेधले. अबू आझमी यांच्या प्रश्नाला गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी उत्तर दिले. परंतु, यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावर सविस्तर भूमिका मांडली. राज्यमंत्र्यांनी योग्य उत्तर दिले आहे. या सभागृहातील चर्चा राज्यभरात जाते, म्हणून या माध्यमातून या सभागृहातील सदस्यांना तसेच राज्यातील नागरिकांना सांगतो की, डिजिटल अरेस्ट असा प्रकारच नाही. कायद्याने कोणालाही डिजिटल अरेस्ट करता येत नाही. त्यामुळे कोणी डिजिटल अरेस्टचा फोन केला किंवा व्हिडिओ कॉल



केला तर पहिल्याच क्षणी समजून घ्यावे की, हा फ्रॉड आहे. १०० टक्के हा फ्रॉड आहे. कोणत्याही कायद्यान्वये कोणीही कोणाला डिजिटल अरेस्ट करू शकत नाही, असे फडणवीस यांनी स्पष्ट केले.

**पूर्ण ऑपरेशन विदेशातून होते**

एक फोन येतो किंवा व्हिडिओ कॉल येतो, त्यावर समोर बसलेला माणूस स्वतःला सीबीआय किंवा पोलीस अधिकारी सांगतो. मग तिथून तो म्हणतो की, तुम्ही पार्सल मागवले का? त्यात ड्रग्स सापडले आहेत. तुम्हाला जागचे हलण्याचीही परवानगी दिली जात नाही. तुम्हाला स्क्रीनपुढेच राहायला सांगितले जाते. त्यातून सुटण्याकरिता पैसे पाठवण्याची मागणी केली जाते. मग सामान्य माणूस घाबरून पैसे ट्रान्स्फर करतो. डिजिटल अरेस्ट प्रकरणात फक्त सामान्य माणूस नाहीतर अनेक मोठे अधिकारी, निवृत्त अधिकारीही अडकले जातात. पीडितांनी पैसे पाठवले की ते पैसे वेगवेगळ्या खात्यांमध्ये तत्काळ ट्रान्सफर केले जातात, मग ते विदेशातील खात्यात पाठवले जातात. अनेक प्रकरणात असे लक्षात आले आहे की, पूर्ण ऑपरेशन विदेशातून होते, अशी माहिती मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली.

## मंत्र्यांनी लक्षवेधीवर बोलताना अभ्यास करून यावे

### नुसते बघतो, बैठक लावतो, असे म्हणून चालत नाही; मुनगंटीवारांनी उडवली मंत्र्यांची भंबेरी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४मुंबई-** भाजपचे ज्येष्ठ नेते तथा माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी आज विधानसभेत लक्षवेधीला उत्तर देण्याच्या मुद्यावरून अन्न व नागरी पुरवठा विभागाचे राज्यमंत्री योगेश कदम यांना अक्षरशः फैलावर घेतले. लक्षवेधीवर बोलताना



मंत्र्यांनी अभ्यास करून यायला हवे. केवळ बघतो, बैठक लावतो, असे सांगून चालत नाही, असे ते या प्रकरणी मंत्री कदम यांचे कान टोचत म्हणाले. राज्य विधीमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी आज राज्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांना बोनस देण्याच्या मुद्यावर लक्षवेधी मांडण्यात आली. या प्रकरणी विरोधकांनी सरकारला धारेवर धरल्यानंतर त्यांना सत्ताधारी आमदारांचीही साथ मिळाली. यात भाजप आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी सरकारला अक्षरशः सळो की पळो करून सोडले. त्यांनी लक्षवेधीला थातूर मातूर उत्तर देण्याच्या मुद्यावरून अन्न व नागरी पुरवठा मंत्री योगेश कदम यांना चांगलेच खडेबोल सुनावले. लक्षवेधीवर बोलताना मंत्र्यांनी अभ्यास करून यायला हवे. केवळ बघतो, बैठक लावतो असे बोलून चालत नाही, असे ते म्हणाले.

## पवारांची तिसरी पिढी राज्यसभेत जाणार

### राष्ट्रवादी काँग्रेसकडून पार्थ पवारांना संधी,

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४मुंबई**

महाराष्ट्रातील राज्यसभा निवडणुकीच्या रणधुमाळीला वेग आला असून, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाने आपला 'पत्ता' खोलला आहे. सोमवारी रात्री पार पडलेल्या कोअर कमिटीच्या बैठकीत पार्थ पवार यांना राज्यसभेच्या रिंगणात उतरवण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. तसेच, पक्षाची सर्व धुरा सुनेत्रा पवार यांच्याकडे सोपवत त्यांची राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड करण्यावरही शिक्कामोर्तब करण्यात आले आहे.प्रफुल पटेल यांच्या मुंबईतील निवासस्थानी राष्ट्रवादी काँग्रेसच्या कोअर कमिटीची खलबते पार पडली. या बैठकीला सुनेत्रा पवार आणि प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे उपस्थित होते. मागील लोकसभा निवडणुकीतील पराभवानंतर पार्थ पवार सक्रिय राजकारणापासून काहीसे दूर होते. मात्र, आता त्यांना थेट दिल्लीच्या वरिष्ठ सभागृहात (राज्यसभा) पाठवून पक्षाने तरुण नेतृत्वाला संधी देण्याचे निश्चित केले आहे. येत्या २६ फेब्रुवारीला



वरळी डोम येथे होणाऱ्या राष्ट्रीय कार्यकारिणीच्या बैठकीत सुनेत्रा पवार यांची अधिकृतपणे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून घोषणा केली जाईल.

**भाजपच्या कोअर कमिटीची आज बैठक; तावडेंना संधी?**दुसरीकडे, भाजपनेही आपले उमेदवार निश्चित करण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आणली आहे. आज रात्री १० वाजता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या 'सागर' बंगल्यावर भाजपची महत्त्वाची बैठक होणार आहे. महायुतीकडून पुन्हा एकदा आरपीआय नेते रामदास आठवले यांचे नाव जवळपास निश्चित आहे.

## अजित पवारांच्या विमानाचे ३००० तासांचे रेकॉर्डच नाही: रोहित पवार यांचा दावा

### 'VSR' कंपनीच्या रेकॉर्डमध्ये हेराफेरी असल्याचा आरोप

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४मुंबई**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघातातील निधनानंतर आता या प्रकरणाला नवे वळण लागले आहे. अजित दादांचा अपघात हा अपघात नसून घातपात आहे, असा खळबळजनक दावा त्यांचे पुतणे आणि आमदार रोहित पवार यांनी केला असून, या तपासातील 'व्हीसीआर' (तडठ) कंपनीच्या रेकॉर्डबाबत त्यांनी अत्यंत धक्कादायक माहिती समोर आणली आहे. विमानाच्या रेकॉर्डमध्ये मोठी बनवाबनवी सुरू असून यंत्रणांची एकमेकांशी मिलीभगत असल्याचा आरोप रोहित पवार यांनी सोशल मीडिया पोस्टद्वारे केला आहे.

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा गत २८ जानेवारी रोजी बारामतीजवळ विमान अपघातात निधन झाले होते. या दुर्घटनेत अजित पवारांसह पाच जणांचा मृत्यू झाला होता. या अपघात प्रकरणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी चौकशीची मागणी लावून धरली आहे. आता याच चौकशीच्या प्रक्रियेवर त्यांनी



गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

अजित दादांच्या अपघातातील विमानाच्या चौकशीच्या निमित्ताने रोहित सिंगला काल पायलट म्हणून चौकशीसाठी बोलवण्यात आल्याची माहिती मिळत असून काल रोहित सिंग देशात आला होता. तसेच तडठ कडे विमानाच्या ५००० तासांपैकी केवळ १८०० ते २००० तासांचा रेकॉर्ड उपलब्ध असून उर्वरित ३००० तासांचे रेकॉर्डस उपलब्धच नसल्याची धक्कादायक माहिती समोर येत आहे. या मिसिंग रेकॉर्डची हेराफेरी, बनवाबनवी तडठ ला करता यावी यासाठी चौकशी जाणूनबुजून लांबवली जात आहे का? असा प्रश्न रोहित पवार यांनी उपस्थित केला आहे.

## संपादकीय ......

# शिक्षणाचा बाजार!

*उच्च शिक्षणाची गुणवत्ता उंचावण्याची नितांत गरज आहे. पुढील काळात उच्च शिक्षण घेतलेल्या तंत्रकुशल मनुष्यबळाची मागणी वाढणार आहे, त्यासाठी गुणवत्तावाढीशिवाय पर्याय नाही. अनेक पातळ्यांवर गुणवत्ता आणि नवतंत्रज्ञानाची सांगड घालण्याचे प्रयत्न सुरू असतानाच देशात शिक्षणाच्या नावाखाली लांड्यालबाड्यांचे आणि फसवणुकीचे प्रकार वाढीस लागलेले आहेत. एआय परिषदेत अशाच गलगोटिया विद्यापीठाचे बिंग फुटले. देशातील अशा बनावट विद्यापीठांचे जाळे आता १२ राज्यांत पोहोचले असून, त्यात महाराष्ट्रातील दोन विद्यापीठांचा समावेश आहे. दिल्लीतील तब्बल डझनभर विद्यापीठांचा समावेश या यादीत आहे. यानुसार, उत्तर प्रदेशात दिल्लीनंतरची सर्वाधिक, म्हणजे ४ बनावट विद्यापीठे आहेत.*

*गेल्या दोन वर्षांत देशातील अशा संस्थांची संख्या २० वरून ३२ वर गेली. त्यामुळे विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) विद्यार्थी व पालकांना सतर्क राहण्याचा इशारा दिला असून, प्रवेश घेताना काळजी घेण्याचे आवाहन केले आहे. देशातील शिक्षण क्षेत्र किती बरबटलेले आहे, याचीच साक्ष देणारी ही आकडेवारी म्हणावी लागेल. बनावट विद्यापीठांची छाया हरियाणा, राजस्थान, झारखंड आणि अरुणाचल प्रदेश या आणखी ४ राज्यांतही पसरली आहे. वास्तविक, 'यूजीसी'चे मुख्यालय दिल्लीत असूनही तिथेच म्हणजे आसपासच्या राज्यांत बोगस विद्यापीठांचे पीक फोफावल्याचे दिसून येते. याचा अर्थ 'यूजीसी'चीही भीती या संस्थांना उरलेली नाही! केरळ, पश्चिम बंगाल, पुद्दुचेरी, आंध्र प्रदेश, कर्नाटक आणि महाराष्ट्रातही बनावट संस्था उदयाला आल्या आहेत. हरियाणा, आंध्र प्रदेश, कर्नाटक, महाराष्ट्र ही वास्तविक प्रगत राज्ये समजली जातात. आयटी, बायोटेक, इलेक्ट्रॉनिक्स अशा अनेक क्षेत्रांतील अत्याधुनिक उद्योग या राज्यांत आहेत. फार मोठ्या प्रमाणात परदेशी गुंतवणूकदेखील तिथे खेचली जात आहे. महाराष्ट्रात राजा अरबी विद्यापीठ नागपूर आणि सोलापूर जिल्ह्यातील राष्ट्रीय मागासवर्गीय कृषी विद्यापीठ यांचा या काळ्या यादीत समावेश आहे.*

*देशातील बनावट संस्था किंवा विद्यापीठे ही परदेशी विद्यापीठांची नावे वा लोगो वापरून, स्वतःला वैध ठरवण्याचा प्रयत्न करतात. महाराष्ट्रात आपले नाव व लोगो वापरून एक बनावट विद्यापीठ कार्यरत असल्याची तक्रार कोलंबिया विद्यापीठाने 'यूजीसी'ला पत्र लिहून केली होती. त्यानंतर पुन्हा 'यूजीसी'ने विद्यार्थी व पालकांना सावध केले आहे. जर एखादा विद्यार्थी कुठे प्रवेश घेत असेल, तर त्याने 'यूजीसी'च्या संकेतस्थळावर जाऊन बोगस विद्यापीठांची यादी तपासावी, असे आवाहन केले. परंतु, 'यूजीसी' केवळ बनावट विद्यापीठांची यादी जाहीर करते आणि प्रत्यक्ष कारवाई मात्र करत नाही, अशी सार्वत्रिक तक्रार आहे. शहरांपासून ते खेड्यांपर्यंत विद्यापीठांचा पसारा आहे. त्यापैकी काही ठिकाणी बोगसगिरीला विद्यार्थी बळी पडतात. त्यामुळे त्यांचा वेळ आणि पैसा दोन्ही वाया जातो. शिवाय, या संस्थांकडून मिळालेल्या पदव्यांना काहीही अर्थ नसतो. त्यामुळे विद्यार्थ्यांचे भविष्य धोक्यात येते.*

*मध्यंतरी 'यूजीसी'ने प्रसिद्धीपत्रक काढून बंगळूरमधील ग्लोबल ह्यूमन पीस युनिव्हर्सिटीत प्रवेश घेऊ नये, असे म्हटले होते. परंतु, त्यापूर्वीच ज्यांनी अशा कथित विद्यापीठांतून प्रवेश घेतला असेल, त्यांचे काय होणार? हा खरा प्रश्न. ऑक्टोबर २०२३ मध्येदेखील 'यूजीसी'ने देशभरात तब्बल २० विद्यापीठे बोगस असल्याचे जाहीर केले. त्या यादीत दिल्लीतील ८ विद्यापीठांचा समावेश होता. त्यामुळे राजधानी दिल्ली बोगस विद्यापीठांचीदेखील राजधानी ठरली आहे! याबाबत दिल्लीतील राज्य सरकारदेखील काय करते, हाही प्रश्न आहे. त्यावेळी विद्यापीठांच्या कुलगुरूंना लिहिलेल्या पत्रात 'यूजीसी'ने म्हटले होते की, 'यूजीसी कायदा १९५६, कलम २ व कलम ३ अ नुसार ही विद्यापीठे कायदेशीर नाहीत. त्यामुळे त्यांनी पदवी देणे किंवा युनिव्हर्सिटीचे नाव धारण करणे, म्हणजे निष्पाप विद्यार्थ्यांची घोर फसवणूकच आहे. तुमच्या संस्थेच्या भोंगळ कारभारास अनेक विद्यार्थी बळी पडत आहेतच. १५ दिवसांत याबाबतचा खुलासा करावा. योग्य प्रतिसाद न मिळाल्यास 'यूजीसी' तुमच्या विरोधात कठोर कारवाई करेल.' परंतु, याचा कोणताही उपयोग न होता, नवनवीन विद्यापीठे स्थापन होत असतील, तर केंद्र सरकारचा अथवा 'यूजीसी'चा कोणताही धाक त्यांच्यावर उरलेला नाही, असा त्याचा अर्थ होतो.*

*भारतातील सर्वात मोठी समस्या म्हणजे नोकर्यांचा अभाव. देशातील बेरोजगारीचा अधिकृत दर ५.१ टक्के असून, वास्तवात तो त्यापेक्षा अधिकच असण्याची शक्यता आहे. युवावर्गातील बेरोजगारीचा दर १५ टक्के आहे. ५५ टक्के लोक स्वयंरोजगारात किंवा असंघटित क्षेत्रात कार्यरत आहेत. त्या ठिकाणी नियमित रोजगार नसतो आणि वेतन किंवा उत्पन्न कमी असते. कृत्रिम बुद्धिमत्ता किंवा एआयच्या वाढत्या वापरामुळे काही क्षेत्रांतील रोजगार कमी होईल. परंतु, नवनवीन क्षेत्रांची दालने खुली होण्याची शक्यता आहे. अशावेळी शिक्षणाचा दर्जा उंचावणे अत्यंत महत्त्वाचे; पण अलीकडच्या काळात अनेक व्यापारीवृत्तीचे लोक आणि बाजारबुणगे शिक्षण क्षेत्रात धुडगूस घालत आहेत. विविध नावे धारण करून विद्यार्थी व पालकांवर छाप पाडायची, मोठी इमारत उभी करायची, वारेमाप फी गोळा करायची आणि जेवढा पैसा खेचता येईल तेवढा खेचायचा, हे या मंडळींचे उद्योग आहेत.*

*पदव्यांची विक्री करून तिजोर्या भरताना आपण असंख्य गोरगरीब व मध्यमवर्गीयांची फसवणूक करत आहोत, याची लाजही या मंडळींना वाटत नाही. प्रसिद्ध संस्थांच्या नावांशी मिळतीजुळती नावे वापरून विद्यार्थ्यांची दिशाभूल केली जाते. विद्यार्थ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. चांगल्या संस्थांमध्ये प्रवेश मिळवण्याच्या स्पर्धेत बोगस संस्था शिक्षणाच्या बनावट संधी पुरवतात. नोकरीसाठी किंवा परदेशी जाण्याकरिता पदव्यांची मागणी असते, त्याचाच फायदा घेऊन ही विद्यापीठे डाव साधतात. वारंवार निर्देश देऊनही या विद्यापीठांवर कोणतीही ठोस कारवाई करण्यात आली नसल्याबद्दल 'यूजीसी'ने नाराजी व्यक्त केली आहे. राजकीय हितसंबंध आणि सत्ताधार्यांचे संरक्षण असल्याशिवाय अशी राजरोस बनवाबनवी चालू शकत नाही. केंद्र व राज्य सरकारांनी एकमेकांकडे बोट न दाखवता, अशा संस्थांना बडगा दाखवून विद्यार्थ्यांची लूट वेळीच थांबवावी, हीच अपेक्षा.*

# तीळ पिकाची लागवड करताय, नवीन शेतकऱ्यांसाठी संपूर्ण तीळ लागवड तंत्रज्ञान

**दि.२४विदर्भ प्रजासत्ताक**

महाराष्ट्र राज्यात मागील दोन वर्षापासून शेतकरी उन्हाळी तिळ लागवडीकडे वळला असून मोठ्या क्षेत्रात तिळ पिक उन्हाळी हंगामात घेत आहे. शासनाच्या `ळश्रीशशव ळश्रीळेप अंतर्गत तिळ पिकाचे बियाणे शेतकऱ्यांना वितरित करण्यात आले आहे. महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी यांनी उन्हाळी हंगामासाठी वर्ष २०२३ मध्ये फुले पूर्णा नावाची तिळ पिकाची जात विकसित करून केंद्रीय जात समिती द्वारा लागवडीसाठी शिफारस करण्यात आली आहे.




फुले पूर्णा तिळ पिकाच्या जातीला महाराष्ट्र, गुजरात, मध्य प्रदेश या राज्यातील शेतकऱ्यांकडून मोठ्या प्रमाणावर मागणी होत आहे. जळगाव, नंदुरबार, धुळे जिल्ह्यात केळी पिकात आंतरपीक म्हणून तिळ पिकाची ठिंबक वर लागवड करीत आहे. मागील वर्षी शेतकरी वर्गास केळीमध्ये आंतरपीक म्हणुन तिळ पिकाचे उत्पादन अधिक मिळाले आहे.

शेतकऱ्यांनी खालीलप्रमाणे लागवडीचे सूत्र अवलंबल्यास त्यांना तिळ पिकाचे अधिक उत्पादन घेता येईल.

नव्याने तीळ लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी महत्वाच्या काही गोष्टी :

जमीन : जमीन खोल नांगरून तयार करावी.

शेणखत : ५ टन/हेक्टरी जमिनीत टाकावे.

जमीन भुसभुशीत करून फळी मारून सपाट करावी.

पेरणी : पेरणी बैल पाभरीने करावी.

बियाणे पेरणीची खोली : जमिनीत २.५ सेंटीमीटर खोली इतक्या खोलीवर बियाणे पेरावे.

जमिनीत २.५ सेंटीमीटर खोली पेक्षा जास्त खोलीवर टाकल्यास बियाणे उगवत नाही.म्हणून पेरणी करतांना

योग्य ती काळजी घावी.

ट्रॅक्टरने पेरणी करू नये. कारण ट्रॅक्टरला लावलेल्या पाभरीने बियाणे २.५ सेंटीमीटर खोलीवर न पडता त्याहून अधिक खोलीवर पडून पुढे उगवनक्षमता अतिशय कमी होते. म्हणून ट्रॅक्टरने पेरणी करणे टाळावे.

वाळलेल्या शेणाच्या गोवऱ्या कुटून बारीक पावडर तयार करून चाळणीने गाळून घ्यावी. या पावडर मध्ये तीळ बियाणे एकत्रित करून पाभरीने पेरणी करावी.

साधारणपणे १ किलो बियाणात ५ किलो गोवऱ्या कुटलेली पावडर एकत्रित करून पाभरीने पेरणी करावी.

पेरणी अंतर : ४५ ु १० सेंटीमीटर अंतरावर करावी.

बियाणे : २.५ किलो/हेक्टर तीळ बियाणे वापरावे

सुधारित जाती : फुले पूर्णा, जे.एल.टी. ४०८, फुले तीळ न.१,एकेटी-१०१,छढ-११, ऋ-१

पेरणीची वेळ : १४ जानेवारी ते १५ फेब्रुवारी

खत व्यस्थापन : ५० किलो नत्र/हेक्टरी विभागून द्यावा.

पहिला नत्राचा हप्ता : २५ किलो नत्र/हेक्टरी पेरणीचे वेळी द्यावा.

दुसरा नत्राचा हप्ता : २५ किलो नत्र/हेक्टरी पिक ३० दिवसाचे पिक झाल्यानंतर द्यावा.

जमिनीत पुरेसा ओलावा असतांना पेरणी करावी.

तीळ हे पिक जास्त पाण्याला अतिशय संवेदनशील असलेने दलदल असलेल्या भागात पेरणी करू नये.

विरळणी : पिक उगवण झाल्यानंतर पहिली विरळणी १५ दिवसांनी करावी. दुसरी विरळणी ३० दिवसांनी करावी.

पिक संरक्षण : तीळ पिकावर पाने कुरतडणारी अळीचा प्रादूर्भाव दिसून आल्यास क्विनोल्फोस १ मिली. प्रती लिटर पाणी या प्रमाणे पिकावर फवारणी करावी.

कोळपणी : पेरणीचे अंतर ४५ ु १० सेंटीमीटर असलेने बैल कोळप्याने पहिली कोळपणी पिक ३० दिवसाचे असतांना करावी.

प्रथम निंदनी : पिक ३० दिवसाचे असतांना करावी.

दुसरी कोळपणी : ४५ दिवसांनी करावी.

दुसरी निंदनी : तण तीव्रता बघून पिक ६० दिवसाचे असतांना दुसरी निंदनी करावी.

पिक काढणी : साधारणपणे तिळाच्या बोन्ड्या पिवळसर झाल्याने कापणी करावी.

कापणी केल्यावर पेंढ्या बांधून त्यांच्या खोपड्या करून वाळवाव्यात.

साधारणपणे काढणीनंतर १० ते १५ दिवस पेंढ्या वाळवाव्यात.त्यानंतर जागेवरच तीळ बियाणे पेंढ्या उलट्या करून झटकून घ्यावे.

उत्पन्न : ७ ते ८ क्विंटल/हेक्टरी.

**डॉ.सुमेरसिंग राजपूत,**
**तीळ पैदासकार**

## आरोग्य संपदा आहार विशेष

# साधं पांढरं मीठ न खाता पिंक सॉल्ट खाल्ल्यानं खरचं फायदा होतो का?

**दि.२४विदर्भ प्रजासत्ताक**

मिठाशिवाय अन्नाला चव येत नाही. काहीजण पदार्थांत वरून मीठ घेतात. मीठ घातलं नाही तर सर्व पदार्थ अळणी लागतात. जसजसे लोक हेल्दी लाईफस्टाईलकडे वळत आहेत तसतसं फॅन्सी फूड आयटम्सचा ट्रेंड्स वाढत आहे. यातीलच एक म्हणजे पिंक सॉल्ट म्हणजेच सैंधव मीठ याला हिमालियन सॉल्ट असंही म्हणतात. असं मानलं जातं की यात जास्तीत जास्त मिनरल्स असतात.




म्हणूनच हे मीठ साध्या आयोडीनयुक्त मीठाच्या तुलनेत चांगलं असतं. पण हा बदल जितका हेल्दी दिसतो तितका हेल्दी नाहीसुद्धा. बेंगलुरूचे फिटनेस कोच राल्स्टन डिसूजा यांनी २० फेब्रुवारीला आपल्या पोस्टमध्ये मिठाच्या सेवनाबाबत काही मुद्दे उपस्थित करून लोकांना रोजच्या आयुष्यात आयोडीनयुक्त मीठाऐवजी आयोडीनयुक्त मिठाचा आहारात समावेश करण्याच्या धोक्यांबाबत सांगितले आहे.गुलाबी मिठात ट्रेस मिनरल्स जास्त असतात पण याचे फायदे खूपच कमी असतात. त्याचे फायदे मिळवण्यासाठी हे मीठ जास्त प्रमाणात खायला हवं, जे आरोग्यासाठी योग्य नाही. आयोडीनसारख्या पोषक तत्वांच्या कमतरतेमुळे अनेक समस्या उद्भवू शकतात. याव्यतिरिक्त गुलाबी मिठाची किंमत आयोडीनयुक्त मिठाच्या तुलनेत दुप्पट असते. जी आरोग्यासाठी नुकसानकारक ठरू शकते.

भारतीय लोकांच्या आहारात आयोडीनची कमतरता ही एक मोठी वैद्यकीय स्थिती आहे. १९६० च्या दशकात यामुळे थायरॉईड, गर्भावस्थेच्या समस्या, मानसिक विकार यांसारख्या गंभीर स्थिती उद्भवत आहेत. आयोडीन थायरॉईड फंक्शनला सपोर्ट करण्यास महत्वाची भूमिका बजावतो. याच्या कमतरतेमुळे हायपोथायरॉयडीझम किंवा इतर थायरॉईड डिसॉर्डर्स होऊ शकतात.

# राणीघाट अपघातात आणखी एक मृत्यू, मृतकांची संख्या झाली पाच

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४अमरावती,** धारणी तालुक्यातील राणीघाटामध्ये रविवारी रात्री झालेल्या अपघातातील जखमींना जिल्हा सामान्य रूग्णालयात दाखल करण्यात आले होते. यातील रिता राठोड यांचा सोमवारी सकाळी उपचारादरम्यान मृत्यू झाला. या अपघातातील मृतकांची संख्या आता पाच झाली आहे. उर्वरित जखमी आणि त्यांच्या नातेवाईकांची जिल्हाधिकारी आशिष येरेकर ग्रामीण पोलीस अधीक्षक

विशाल आनंद यांनी भेट घेऊन माहिती घेतली. जखमींवर योग्य उपचार करण्याची सूचना केली.जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. विनोद पवार आदी उपस्थित होते. अपघातामधील अर्चना दारासिंगे रा. कंजोली, गेरुबाई देवळे रा. मोठेखेडे, रिता राठोड रा. सिनंबद, देवा धांडे, रा. कंजोली, मुनी दहीकर रा. कंजोली, विकेश दहीकर रा. सालाई सर्व ता. धारणी यांना जिल्हा सामान्य रूग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. जिल्हाधिकारी येरेकर यांनी सुरवातीला अपघात कक्षातील जखमी भुनी दहीकर यांना भेट दिली. यावेळी त्यांनी नातेवाईकांकडून अपघाताची माहिती घेतली. त्यानंतर अपघातातील अर्चना दारसिंगे या गर्भवती महिलेची भेट घेतली. अपघातामुळे माता व बाळ दोन्ही सुरक्षित ठेवण्यासाठी उपचार करावेत. त्यांची तब्येत पूर्ण बरी झाल्यानंतरच त्यांना रूग्णालयातून सुट्टी द्यावी, अशा सूचना केल्या.

**चालकाविरुद्ध गुन्हा दाखल** – अपघातातील बोलेरो पिकअप हे वाहन गोलाई येथील नामदेव सिताराम कातकडे यांच्या नावावर आहे. या वाहनाचा चालक दिपक सज्जुलाल सावलकर (वय ३०, रा. कंजोली) याच्याविरुद्ध धारणी पोलिस स्टेशन येथे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. तोच अपघाताला कारणीभूत ठरला आहे. पुढील तपास पोलिस निरीक्षक अवतारसिंग चव्हाण करीत आहेत. मेळघाटमध्ये झालेल्या अपघातातील वाहनचालकांवर सक्त कारवाई करावी, अशा सूचना जिल्हाधिकारी येरेकर यांनी जिल्हा पोलिस अधीक्षक विशाल आनंद यांना दिल्या.

## जिल्हाधिकार्यांकडून विचारपूस





**खा. वानखडे यांनी दिली भेट**– खा. वानखडे यांनी मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तींच्या कुटुंबीयांची प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. यावेळी सहाय्यक जिल्हाधिकारी सिद्धार्थ शुक्ला, धारणीचे तहसीलदार प्रदीप शेवाळे, मेळघाटातील विविध राजकीय पक्षाचे पदाधिकारी तसेच गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**खराब रस्त्यामुळे अपघातांची मालिका–** सदर रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मार्गदर्शनाखाली मंजूर करण्यात आला होता. मात्र, कंत्राटदार कंपनीने काम अर्धवट सोडल्याने रस्त्यावर ठिकठिकाणी खडी, गिट्टी आणि डस्ट पसरलेली आहे. घाटमाथ्यावरील वळणदार आणि चढावाच्या रस्त्यावर अशा प्रकारे बांधकाम साहित्य राहिल्याने वाहनांचे संतुलन बिघडत असून अपघातांची शक्यता वाढत आहे.

# पूर्व विदर्भात वादळी पावसाचा 'यलो अलर्ट'

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२४ अमरावती –** राज्यात सध्या हवामानाचा अजब खेळ सुरू आहे. एकीकडे तापमान झपाट्याने वाढत असताना दुसरीकडे काही भागांमध्ये मेघगर्जनेसह अवकाळी पावसाची हजेरी लागत आहे.

उत्तर भारतापासून पश्चिमेकडील भागांपर्यंत होत असलेल्या हवामान बदलांचा परिणाम आता महाराष्ट्रातही स्पष्टपणे जाणवू लागला आहे.थंडीने राज्यातून काढता पाय घेतल्यानंतर बहुतांश भागांमध्ये उष्मा वाढला आहे. मात्र, गेल्या ४८ तासांपासून वातावरणात झालेल्या बदलांमुळे मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात पावसासाठी पोषक स्थिती निर्माण झाली आहे.

चऊ ने दिलेल्या अंदाजानुसार, पूर्व विदर्भात वादळी पावसाचा 'यलो अलर्ट' जारी करण्यात आला आहे.चंद्रपूर, गडचिरोली या जिल्ह्यांत विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे.तसेच मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रातील सोलापूर, धाराशिव, लातूर, नांदेड या भागांतही विजांसह तुरळक सरींचा अंदाज आहे.

**अचानक उन्हाळी पाऊस का?**

बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या क्षेत्राचा परिणाम महाराष्ट्रावर होत आहे. या प्रणालीमुळे दक्षिण-मध्य महाराष्ट्रापर्यंत कमी



दाबाचा पट्टा सक्रिय झाला असून वातावरणात आर्द्रता वाढली आहे.

**आरोग्य सांभाळा!**

हवामानातील या अचानक बदलांमुळे सर्दी, ताप, उष्माघात, डिहायड्रेशन यांसारख्या तक्रारी वाढण्याची शक्यता आहे.

दुपारच्या उन्हात बाहेर पडणे टाळा

भरपूर पाणी प्या

हलका, सुती कपड्यांचा वापर करा

वादळी पावसाच्या वेळी झाडांखाली थांबू नका

राज्यात सध्या 'उन्हाळी पावसाळा'सदृश परिस्थिती निर्माण झाली असून पुढील काही दिवस हवामानात चढ-उतार कायम राहण्याची शक्यता आहे.

त्यामुळे नागरिकांनी आणि शेतकऱ्यांनी हवामान विभागाच्या सूचनांकडे लक्ष देत खबरदारी घेणे आवश्यक आहे.

# २६ ला स्वच्छतेसंदर्भात महापालिकेची विशेष आमसभा

## प्रशासनाला घेरण्याचा नवनिर्वाचित नगरसेवकांचा प्रयत्न

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२४अमरावती** शहरातील दैनंदिन साफसफाई व्यवस्थेचा आढावा घेऊन आवश्यक निर्णय करण्यासाठी अमरावती महानगरपालिकेने गुरुवारी (ता. २६) विशेष सर्वसाधारण सभेचे आयोजन केलेले आहे. ही बैठक सकाळी ११ वाजता महापालिका येथील विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह येथे पार पडणार आहे.



या सभेत शहरातील स्वच्छता व्यवस्थेची सद्यःस्थिती, कचरा संकलनाची कार्यपद्धती, मनुष्यबळाची उपलब्धता तसेच साफसफाईच्या कामातील अडचणी यावर सविस्तर चर्चा होणार आहे. वाढती लोकसंख्या आणि विस्तारलेल्या शहर सीमेच्या पार्श्वभूमीवर स्वच्छता यंत्रणा अधिक सक्षम करण्यासाठी ठोस उपाययोजना करण्याचा प्रयत्न या बैठकीतून केला जाणार आहे. शहर स्वच्छते संदर्भात पहिल्याच आमसभेमध्ये नगरसेवकांनी प्रशासनाला घेरण्याचा प्रयत्न केला होता. स्वच्छतेच्या मुद्याला हात घालत या विषयावर विशेष सभेचे आयोजन करण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली. सुचक चेतन गावंडे, विलास इंगोले, नाना आमले, अविनाश मार्डीकर, बबलु शेखावत, प्रशांत वानखडे आहे आणि अनुमोदक म्हणून संजय नरवणे, मंगेश मनोहरे, मिलिंद बांबल, प्रशांत महल्ले, संजय शिरभाते हे आहेत. प्रस्ताव क्रमांक २९ अंतर्गत दैनंदिन साफसफाईच्या कामासंदर्भात चर्चा करून निर्णय घेण्यात येणार आहे. संबंधित विषयावर अनेक नगरसेवकांनी सूचना दिल्या असून बैठकीत सर्व सदस्यांची मते विचारात घेऊन पुढील कार्यवाही निश्चित केली जाणार आहे. शहरातील स्वच्छता ही नागरिकांच्या आरोग्याशी निगडित बाब असल्याने या बैठकीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. बैठकीत घेतल्या जाणाऱ्या निर्णयांमुळे स्वच्छता व्यवस्थेत सकारात्मक बदल अपेक्षित असल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

मंगळवार दि. २४ फेब्रुवारी २०२६ शहर/ग्रामिण

# गर्ल्स हायस्कूलच्या विद्यार्थीनींची नावे थेट चंद्रावर

## नासाचा उपक्रम : अंतराळयानातून अमरावती विभागातील अधिकारी, विद्यार्थ्यांची प्रदक्षिणा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती**

जि.प.गर्ल्स हायस्कूल अमरावती या शाळेतील विद्यार्थिनीची नावं थेट चंद्राची प्रदक्षिणा करणार आहे. नासा ही अमेरिकेची अग्रगण्य अंतराळ संशोधन संस्था असून, तिच्या आर्टेमिस २ कार्यक्रमांतर्गत मानवाला पुन्हा चंद्रावर पाठवण्याची तयारी सुरू आहे. या मोहिमेअंतर्गत जगभरातील नागरिकांना 'आभासी प्रवासी' म्हणून सहभागी करून घेण्याची संधी देण्यात आली होती. गर्ल्स हायस्कूल मधील उपक्रमशील शिक्षक विरेंद्र ब्राम्हण यांच्या पुढाकाराने त्यांच्या वर्गातील ३३ विद्यार्थिनी व शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांची नावे चंद्राची सफर करणार आहे.



या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये अवकाश, विज्ञान आणि तंत्रज्ञानाबद्दल आकर्षण निर्माण झाले आहे.

अनेक विद्यार्थी आता मोठे होऊन वैज्ञानिक, अभियंते किंवा अंतराळवीर बनण्याची स्वप्ने पाहू लागले आहेत. जिल्हा परिषद गर्ल्स हायस्कूल ही नेहमीच नाविन्यपूर्ण शैक्षणिक उपक्रमांसाठी ओळखली जाते. शाळेच्या दर्शनी भागात अवकाश यानाचे प्रतिकृती तयार करण्यात आली असून या शाळेला भेट देणारे अनेकजण या प्रतिकृती समोर सेल्फी काढतात. सामान्य माणसाला प्रत्यक्ष अंतराळात जाता येत नसले तरी, त्यांचे नाव प्रतीकात्मक रूपाने चंद्रापर्यंत पोहोचवण्याची ही एक अनोखी संधी आहे. या मोहिमेद्वारे संपूर्ण मानवजातीला अंतराळ मोहिमेसोबत भावनिकदृष्ट्या जोडण्याचा नासाचा प्रयत्न आहे.

### आकर्षक बोर्डिंग पास

जगभरातील लाखो सर्वसामान्य नागरिकांची नावे मायक्रोचिपच्या माध्यमातून 'आर्टेमिस २' मोहिमेतील 'ओरियन' या अंतराळ यानात सुरक्षितपणे ठेवली जाईल.उड्डाण दरम्यान ही सर्व नावे पृथ्वीवरून तब्बल ४ लाख किलोमीटरचा प्रवास करतील. यामध्ये प्रत्येकाच्या नावाने स्वतंत्र 'व्हर्च्युअल बोर्डिंग पास' तयार होणार असून ही पास एखाद्या खऱ्या विमान प्रवासाच्या तिकिटासारखे डिझाईन केलेले असतात. या बोर्डिंग पासवर नावासह उड्डाण कोठून होणार, प्रवास ठिकाण व प्रवास अंतर दाखविले आहे.

**शिक्षण विभागाची सफर:**अंतराळ विज्ञानाबद्दल जगभरात, विशेषतः विद्यार्थी आणि तरुण पिढीमध्ये उत्सुकता निर्माण करणे हा यामागचा मुख्य उद्देश आहे. विज्ञानाच्या या ऐतिहासिक भरारीमध्ये आपणही एक 'आभासी प्रवासी' म्हणून सहभागी आहोत, ही भावना यातून निर्माण होते. गर्ल्स हायस्कूलचे विरेंद्र ब्राह्मण यांनी शिक्षण विभागातील उपसंचालक, शिक्षणाधिकारी, डाएट प्राचार्य, अधिव्याख्याता, गट शिक्षणाधिकारी, मुख्याध्यापक सहकारी शिक्षक व विद्यार्थ्यांच्या नावाच्या बोर्डिंग पास काढून त्यांची नावे या मोहिमेत जोडले असल्याचे गटशिक्षणाधिकारी तथा मुख्याध्यापक संदीप बोडखे यांनी सांगितले.

# प्रभाग ६ मध्ये महापौर श्रीचंद तेजवाणी यांची अचानक पाहणी

## स्वच्छतेसाठी प्रशासनाला कडक सूचना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती**

अमरावती महानगर पालिकेचे महापौर श्रीचंद तेजवाणी यांनी आज सोमवार दि. २३ फेब्रुवारी रोजी सकाळी प्रभाग क्र. ६ विलास नगर-मोरबाग परिसरातील हजरत बिलाल नगर, न्यू कॉटन मार्केट रोड, शेगाव, रहाटगाव रोड, के.एल. कॉलेज रोड, मसानगंज, कल्पना नगर व इतवारा बाजार परिसराची स्वच्छतेबाबत पाहणी केली. पाहणीदरम्यान महापौरांनी स्वच्छता, आरोग्य आणि शिस्तबद्ध प्रशासनाला सर्वोच्च प्राधान्य देण्याचा निर्धार व्यक्त केला. शहरातील स्वच्छतेच्या कामात कोणतीही ढिलाई सहन केली जाणार नसून निष्काळजीपणा करणाऱ्या स्वास्थ्य निरीक्षकांवर कठोर प्रशासकीय कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा त्यांनी दिला.प्रशासनाला आदेश देताना महापौरांनी सांगितले की, प्रत्येक प्रभागातील स्वास्थ्य निरीक्षकांनी दररोज क्षेत्रभेट देणे बंधनकारक राहील. रस्ते, नाले, सार्वजनिक



### घाण, कचरा व प्रलंबित कामांबाबत अधिकाऱ्यांना तातडीने कारवाईचे आदेश

ठिकाणे आणि कचरा संकलन केंद्रांवर नियमित स्वच्छता होत आहे की नाही, याची स्वतः पाहणी करून अहवाल सादर करणे आवश्यक राहील. नागरिकांना अस्वच्छतेचा त्रास होणार नाही, याची जबाबदारी संबंधित अधिकाऱ्यांचीच असेल, असे त्यांनी ठामपणे नमूद केले.नगरसेवक किंवा नागरिकांकडून स्वच्छतेबाबत तक्रार प्राप्त झाल्यास ती तात्काळ निकाली काढणे बंधनकारक राहील. तक्रारी प्रलंबित ठेवणे किंवा दुर्लक्ष करणे अजिबात सहन केले जाणार नाही. एखाद्या स्वास्थ्य निरीक्षकाविरुद्ध नगरसेवकांकडून तक्रार आल्यास थेट कारवाई करण्यात येईल, असेही महापौरांनी स्पष्ट केले.स्वच्छतेच्या मोहिमेत लोकसहभाग अत्यंत महत्त्वाचा असल्याचे सांगत महापौरांनी नागरिकांना कचरा निर्धारित ठिकाणीच टाकण्याचे व स्वच्छतेचे नियम पाळण्याचे आवाहन केले. स्वच्छतेच्या कामांचा आढावा घेऊन संबंधित स्वास्थ निरीक्षकांना जागेवरच सूचना देण्यात आल्या.

अमरावती स्वच्छ, सुंदर आणि निरोगी व्हावी, यासाठी प्रशासनासोबत नागरिकांचे सहकार्यही तितकेच महत्त्वाचे आहे असे महापौर श्रीचंद तेजवाणी यांनी सांगितले.महानगरपालिका प्रशासन शहर स्वच्छ ठेवण्यासाठी कटिबद्ध असून स्वच्छतेच्या बाबतीत कोणतीही तडजोड केली जाणार नाही, असा ठाम संदेश महापौरांनी दिला.या पाहणी दरम्यान सन्मा.नगरसेवक संजय नरवणे, दिपक साहू (सम्राट), कौशिक अग्रवाल, पंजाबराव तायवाडे, स्वास्थ निरीक्षक, सफाई कामगार उपस्थित होते.

# दलित वस्ती सुधार योजनेतील कामांना गती मिळणार

## ६७० विकास कामांवरील स्थगिती उठवली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती,**

अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्तीचा विकास करण्यासाठी सन २०२५-२६ या वर्षाकरिता मंजूर करण्यात आलेल्या ६७० विकासकामांवरील स्थगिती उठवण्यात आली आहे. पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या सूचनेनुसार कामांमध्ये बदल करून विकासकामे करण्यात येणार आहे. यामुळे ग्रामीण भागातील पायाभूत सुविधांना वेग मिळणार आहे. जिल्हा परिषद समाज कल्याण विभागामार्फत राबवल्या जाणाऱ्या या योजनेंतर्गत सांडपाणी निचऱ्यासाठी नाली, पाणीपुरवठा, सिमेंट रस्ते, एलईडी लाईट आणि पेविंग



ब्लॉक बसवणे यांसारख्या ६७० कामांची निवड करण्यात आली होती. मात्र, या कामांमध्ये रस्ते आणि पेविंग ब्लॉकच्या कामांचे प्रमाण जास्त असल्याने ही कामे बदलविण्याची सूचना पालकमंत्री श्री. बावनकुळे यांनी केली होती. तसेच सांडपाणी व्यवस्थापन, गटार व्यवस्था आणि पाणीपुरवठा यासारख्या मूलभूत सुविधांना प्राधान्य देण्याचे निर्देश दिले होते. या निर्देशानुसार, गट विकास अधिकाऱ्यांनी जुन्या यादीतील ११२ कामांमध्ये बदल करून नवीन कामांचे प्रस्ताव सादर केले आहेत. त्यामुळे आता ६७० विकासकामे सुरू होणार आहे. या कामांमध्ये रस्ते आणि पेविंग ब्लॉकऐवजी आता आरोग्य आणि स्वच्छतेशी संबंधित कामांमध्ये गटारे, पाणीपुरवठा यावर भर दिला जाणार आहे. सर्व कामांचे जिओ टॅगिंग आणि छायाचित्र पालकमंत्र्यांसमोर सादर करण्यात आले आहेत. बदललेल्या ११२ कामांचे प्रस्ताव ग्रामपंचायत ठराव, प्रमाणपत्रे आणि अंदाजपत्रकासह तातडीने प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करावेत, असे आवाहन जिल्हा समाज कल्याण अधिकारी डी. एम. पुंड यांनी केले आहे.

# इ-शिवाई चालकाने प्रवाशांचा मौल्यवान ऐवज परत केला

## प्रामाणिकतेबद्दल वाहतूक नियंत्रकांनी सत्कार करून केले कौतुक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती**

इ-शिवाई बसचे चालक विवेक बोंडे यांनी कर्तव्यनिष्ठेचे उत्तम उदाहरण घालून दिले आहे. त्यांनी दोन वेगवेगळ्या घटनांमध्ये प्रवाशांनी बसमध्ये विसरलेला मौल्यवान ऐवज प्रामाणिकपणे परत केला. त्यांच्या या कृतीबद्दल इ-शिवाईचे वाहतूक नियंत्रक राजेश विजयकर यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.




महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या इ-शिवाई बसमध्ये ७ फेब्रुवारी रोजी एका प्रवाशाची बॅग विसरली होती. चालक विवेक बोंडे यांना बॅगेची तपासणी करताना त्यात एक लॅपटॉप आणि पैशाचे पाकीट आढळले.त्यानंतर १६ फेब्रुवारी रोजी पुन्हा त्यांच्या बसमध्ये एका प्रवाशाने आपली पैशाने भरलेली पर्स विसरली. बोंडे यांनी दोन्ही घटनांमध्ये कोणताही लोभ न बाळगता, संबंधित प्रवाशांशी संपर्क साधून वरिष्ठांच्या समक्ष तो ऐवज परत केला.

या प्रामाणिक कार्याबद्दल अमरावती आगारात इ-शिवाईचा कारभार सांभाळणारे वाहतूक नियंत्रक राजेश विजयकर यांनी चालक बोंडे यांचा सत्कार करून कौतुक केले. इतर चालक-वाहकांनीही या आदर्श कृतीतून प्रेरणा घ्यावी, असे आवाहन विजयकर यांनी यावेळी केले.

या सत्कार समारंभाला विभागीय वाहतूक अधिकारी संदीप रायलवार, तसेच अधिकारी श्रीकांत देवरे, नंदकिशोर काळे, हर्ष कोसे, रोशन शेख, सत्यम राजगुरे, रोशन सरकटे, सुपरवायझर आदित्य सहारे, विनायक सपाटे आणि पवन सपाटे यांच्यासह अनेक कर्मचारी उपस्थित होते.

# झाडा येथील जवान नक्षल्यांच्या हल्ल्यात गंभीर

## झारखंड येथील घटना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४धा.रेल्वे** राज्यातील साईबासाजवळील सारडा जंगलात नक्षल्यांसोबत गोळीबार सुरू असताना कोब्रा कमांडो दिनेश राऊत गंभीर जखमी झाले. प्रकृती चिंताजनक असल्यामुळे त्यांना दिल्ली येथे हलविण्यात आले असल्याची प्राथमिक माहिती आहे.

दिनेश राऊत हे अमरावती जिल्ह्यातील धामणगाव रेल्वे तालुक्यातील झाडा या गावातील रहिवासी असून सीआरपीएफमध्ये कार्यरत आहेत. कोब्रा कमांडो दिनेश राऊत हे आपल्या देशसेवेत कार्यरत असताना झारखंड राज्यातील साईबासाजवळील सारडा जंगलात नक्षल्यांसोबत झालेल्या गोळीबारात गंभीररीत्या जखमी झाल्याची माहिती आहे. नक्षलवाद्यांसोबत झालेल्या



चकमकीत दिनेश राऊत यांना अनेक गोळ्या लागल्या असून त्यांना तातडीने रांची येथील रुग्णालयात हलवण्यात आले; मात्र प्रकृती चिंताजनक असल्याकारणाने पुढील उपचारासाठी त्यांना दिल्ली येथील एम्स रुग्णालयात पाठवण्यात आले. उपचारा दरम्यान दिनेश राऊत यांच्या शरीरात जहर पसरत चालले असल्याने त्यांचा डावा पाय कापण्यात आल्याचीही प्राथमिक माहिती आहे.

# मेळघाट व्याघ्र प्रकल्प : ५२ वर्षांची यशस्वी वाटचाल, वाघांसाठी सुरक्षित ठिकाण

विदर्भ प्रजासत्ताक
**दि.२४ अमरावती -**

सातपुडा पर्वतरांगांच्या सानिध्यात वसलेल्या मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या स्थापनेला ५२ वर्ष पूर्ण झालीत. २२ फेब्रुवारी १९७३ रोजी स्थापन झालेला हा प्रकल्प देशातील पहिल्या नऊ व्याघ्र प्रकल्पांपैकी एक आहे. सध्या मेळघाटमध्ये ४४ वाघांची नोंद असून, वाघांच्या सुरक्षित अधिवासासाठी हे क्षेत्र अत्यंत महत्त्वाचं मानलं जातं.

१९७० च्या दशकात भारतातील वाघांची संख्या झपाट्यानं घटू लागल्यानं केंद्र सरकारनं १९७३ मध्ये देशात 'प्रोजेक्ट टायगर' अर्थात व्याघ्र प्रकल्प सुरू केला. त्यानुसार सुरुवातीला नऊ व्याघ्र प्रकल्प स्थापन करण्यात आले. आज देशात ५८ व्याघ्र प्रकल्प कार्यरत आहेत. त्यापैकी सहा व्याघ्र प्रकल्प हे महाराष्ट्रात आहेत. सध्या भारतामध्ये ३६०० हून अधिक वाघ आढळून येतात. ही समाधानाची बाब आहे. राज्यनिहाय विचार केला तर मध्य प्रदेशात सर्वाधिक ७४५ वाघ असून महाराष्ट्र चौथ्या क्रमांकावर आहे. महाराष्ट्रात एकूण ४४४ वाघ आहेत.

वाघ हा अत्यंत आक्रमक प्राणी आहे. एक वाघ हा दुसऱ्या वाघाला आपल्या क्षेत्रात सहज येऊ देत नाही. त्यामुळं अधिवास पुरेसा आणि सुरक्षित असणं आवश्यक ठरतं. त्या दृष्टीनं मेळघाटचं विस्तीर्ण जंगल वाघांसाठी आदर्श अधिवास ठरलं असल्याची माहिती मेळघाटात कार्य करणारे




'ऑर्गनायझेशन फॉर कुला'चे अध्यक्ष राजेश महाल्ले यांनी सांगितले.

दर चार वर्षांनी वाघांची गणना केली जाते. त्यासाठी कॅमेरा ट्रॅप प्रणाली, वाघांच्या पावलांचे ठसे आणि वैज्ञानिक पद्धतींचा वापर केला जातो. प्रत्येक वाघाच्या शरीरावरील पट्टे हे वेगळे असतात. माणसांच्या बोटांचे ठसे जसे भिन्न असतात, अगदी तसेच वाघांच्या पट्ट्यांमध्ये फरक असतो. त्यामुळं वाघांची ओळख पटवणं सोपं जातं, अशी माहिती पर्यावरण शास्त्राचे अभ्यासक प्रा.डॉ.वैभव म्हस्के यांनी दिली.

ब्रिटिश काळात मोठ्या प्रमाणात शिकार होत असायची. प्रसिद्ध शिकारी जिम कॉर्बेट यांनी सुरुवातीला नरभक्षक वाघांचा बंदोबस्त केला. मात्र, नंतर त्यांनी वन्यजीव संरक्षणाची गरज अधोरेखित केली. यामुळं त्यांच्या नावावरून 'जिम कॉर्बेट नॅशनल पार्क' स्थापन करण्यात आलं. भारतामध्ये १९७२ साली वन्यजीव संरक्षण कायदा लागू करण्यात आला. या कायद्याअंतर्गत वाघांसह सर्व वन्यजीवांना कायदेशीर संरक्षण देण्यात आलं.

शिकारीमुळं काही प्रजाती लुप्त झाल्या. भारतातील चित्ते १९४७ नंतर नामशेष झाले होते. अलीकडं त्यांचं पुनर्वसन करण्याचा प्रयत्न झाला, असं प्रा.डॉ.वैभव म्हस्के यांनी सांगितलं.

### मेळघाटात इंदिरा गांधींची ऐतिहासिक भेट

१९७२ साली तत्कालीन पंतप्रधान दिवंगत इंदिरा गांधी यांनी मेळघाटला भेट दिली होती. त्यावेळी कोलकास परिसरात त्यांच्यासाठी खास विश्रामगृहाची व्यवस्था करण्यात आली होती. आज देखील कोलकास येथील विश्रामगृह ऐतिहासिक ठिकाण म्हणून ओळखलं जातं. अमरावती, अकोला आणि बुलढाणा अशा पश्चिम विदर्भातील तीन जिल्ह्यात एकूण १ हजार ६४९.३१ चौरस किलोमीटर क्षेत्रफळात सातपुडा पर्वतरांगांमध्ये मेळघाट विस्तारला आहे. मेळघाटातील जंगलात वाघांसह असणारे अनेक प्राणी, पक्षी आणि आदिवासी संस्कृती आपली आगळीवेगळी ओळख निर्माण करून आहे.

# चेक बाऊंस प्रकरणी कडक कारवाई २७ लाखांचे १२० धनादेश अनादरित

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती,**थकीत वीज बिलाची कारवाई टाळण्यासाठी जाणूनबुजून न वटणारे धनादेश देणाऱ्या ग्राहकांविरुद्ध आता कडक पावले उचलण्याचा निर्णय महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी लिमिटेड (महावितरण) ने घेतला आहे. अमरावती परिमंडळात अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी गुन्हे दाखल करण्याच्या हालचालींना वेग देण्यात आला असल्याची माहिती मुख्य अभियंता अशोक साळुंके यांनी दिली.महावितरणच्या लघुदाब वर्गवारीतील ग्राहकांकडून विजबिल भरण्यासाठी दिलेल्या धनादेशांपैकी दरमहा सरासरी सुमारे १५० धनादेश अनादरित (चेक बाऊंस) होत असल्याचे आढळले आहे. काही ग्राहक चुकीची तारीख, खाडाखोड, चुकीची स्वाक्षरी, अपुरे शिल्लक रक्कम किंवा खात्यावरील नावातील तफावत अशा कारणांमुळे धनादेश परत येत असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे वसुलीवर परिणाम होऊन थकबाकीत वाढ होत आहे.यावर उपाय म्हणून




महावितरणने विशेष मोहिम हाती घेतली आहे. चेक बाऊंस झाल्यास संबंधित ग्राहकाला प्रत्येक वीज बिलासाठी विलंब आकार व जीएसटीसह ८८५ रुपयांचा दंड पुढील महिन्याच्या बिलात 'इतर आकार' म्हणून समाविष्ट केला जातो. एका धनादेशातून अनेक बिलांचा भरणा केलेला असल्यास प्रत्येक बिलासाठी स्वतंत्र दंड आकारला जातो. तसेच संबंधित ग्राहकाची धनादेशाद्वारे बिल भरण्याची सुविधा सहा महिन्यांसाठी निलंबित केली जाते.फेब्रुवारी महिन्यातील केवळ २२ दिवसांत अमरावती परिमंडळात २७ लाख रुपयांचे १२० धनादेश अनादरित झाले असून, त्यात अमरावती जिल्ह्यातील ८५ तर यवतमाळ जिल्ह्यातील ३५ धनादेशांचा समावेश आहे. या पार्श्वभूमीवर महावितरणने जाणीवपूर्वक दिशाभूल करणाऱ्या ग्राहकांविरुद्ध कायदेशीर कारवाईचा इशारा दिला आहे.-

# बालनाट्य स्पर्धेची अंतिम फेरी २६ फेब्रुवारी पासून अमरावती येथे होणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती** महाराष्ट्र शासनाच्या वतीने सांस्कृतिककार्य संचालनालयाच्या माध्यमातून विविध नाट्य स्पर्धा आयोजित केल्या जातात. ज्यामध्ये संस्कृत नाट्यस्पर्धा, हिंदी नाट्यस्पर्धा, मराठी हौशी नाट्यस्पर्धा, मराठी व्यावसायिक नाट्यस्पर्धा, मराठी बाल नाट्यस्पर्धा इत्यादींचा समावेश असतो. यामधील काही स्पर्धा प्राथमिक व अंतिम फेरी अशा स्वरुपात होतात तर काही स्पर्धा फक्त एकाच फेरीत होतात. जवळपास ६० वर्षांपेक्षाही अधिक कालावधीपासून या स्पर्धा संपन्न होत आहेत. यावर्षी पहिल्यांदाच नाट्य स्पर्धेची अंतिम फेरी अमरावती मध्ये आयोजित होत आहे.सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार व सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली बाल नाट्य स्पर्धेची अंतिम फेरी पार पडणार असल्याचे सांस्कृतिक कार्य संचालक श्री. विभीषण चवरे यांनी नमूद केलेले आहे.

अमरावतीचे प्रतिनिधी म्हणजे खासदार डॉ. अनिल बोंडे, माजी खासदार नवनीतजी राणा, आमदार रवी राणा, आमदार प्रविण तायडे, आमदार राजेश वानखडे, आमदार



प्रतापदादा अडसड आदी मान्यवरांच्या विशेष प्रयत्नामधून ही स्पर्धा अमरावती येथे आयोजित होत आहे. मागील वर्षी अमरावती केंद्रावर सादर झालेल्या ६० एकांकिकाचा विक्रम या वर्षी अमरावती केंद्रानेच मोडला असून ८९ बाल नाट्यांच्या सहभागाचा नवीन विक्रम स्थापित झालेला आहे. स्पर्धा समन्वयक श्री. विशाल फाटे, अमरावती नाट्य परिषदेचे अध्यक्ष ॲड. चंद्रशेखर डोरले, नाट्य परिषद मध्यवर्ती मुंबई चे नियामक मंडळ सदस्य प्रशांतजी देशपांडे, नाट्य परिषदेचे त्यांचे सहकारी या सर्वांच्या एकत्रीत प्रयत्नांतून या स्पर्धा एका उच्च स्तरावर पोहोचलेल्या आहेत.या वर्षी बाल नाट्य स्पर्धेची अंतिम फेरी छत्रपती श्री. शिवाजी महाराज सभागृह, डॉ. पं.दे. मेडिकल कॉलेज परिसर येथे दि. २६/०२/२०२६ पासून सुरु होत असलेल्या या स्पर्धेत संपूर्ण महाराष्ट्रातून निवड झालेले उत्कृष्ट ४३ बालनाट्य सादर होणार असून १२०४ बाल कलावंत आणि तंत्रज्ञान अमरावती मध्ये आपली कला व कौशल्य सादर करणार आहेत. या स्पर्धेमधून उत्कृष्ट ठरलेल्या बाल नाट्यांना, कलावंतांना तसेच दिग्दर्शक इत्यादी तंत्रज्ञांना रोख पारितोषिक तसेच पदक आणि प्रशस्तीपत्र दिल्या जाणार आहेत.अमरावतीकर कला रसिकांनी या स्पर्धेचा आनंद घ्यावा आणि बाल कलावंतांना प्रोत्साहित करण्याकरिता संपूर्ण स्पर्धे दरम्यान उपस्थित राहावे असे आव्हान नाट्य परिषदेचे स्पर्धा समन्वयक श्री. विशाल फाटे, अमरावती नाट्य परिषदेचे अध्यक्ष ॲड. चंद्रशेखर डोरले, नाट्य परिषद मध्यवर्ती मुंबई चे नियामक मंडळ सदस्य प्रशांतजी देशपांडे, माजी महापौर तथा नाट्य परिषद उपाध्यक्ष श्री. विलास इंगोले, कार्यवाह मिलिंद जोशी व सहकार्यवाह मिलिंद कहाळे यांनी केले आहे.

# मेळघाटात वन्य प्राण्यांचे जीवघेणे हल्ले; प्रशासनासमोर मोठे आव्हान

## दीड ते दोन वर्षात ६२ हून अधिक बळी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती**

मेळघाटात मागील दीड-दोन वर्षांपासून जंगलातील हिंस्र जनावरांच्या हल्ल्यांचे प्रमाण चिंताजनकरित्या वाढले असून २०२४ पासून आजपर्यंत ६२ हून अधिक । निरपराध नागरिकांचा बळी गेला आहे. वारंवार घडणाऱ्या या घटनांमुळे आदिवासी व ग्रामीण भागात भीती आणि असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले आहे.



गेल्या वर्षी गुरे चारत असताना नंदा कास्देकर (५५) यांच्यावर वाघाने हल्ला करूनत्यांचा मृत्यू झाला. त्यानंतरही अशा घटना थांबण्याचे नाव घेत नाहीत. २१ फेब्रुवारी २०२६ रोजी करंजखेडा येथीलस्थानिक केंडे कास्देकर (४५) यांच्यावर जंगली रानडुकराने अत्यंत क्रूर हल्ला केला. या हल्ल्यात त्यांचा जागीच मृत्यू झाला. त्याचप्रमाणे १५ फेब्रुवारी २०२६ रोजीरेट्याखेडा येथील मुन्ना झापू जामुनकर यांच्यावर वाघाने डोक्यावर हल्ला केला. गंभीर जखमी अवस्थेत त्यांना उपचारासाठी दाखल करण्यात आले असून सुदैवाने ते बचावले. स्थानिकांच्या मते, मागील सात-आठ वर्षांत मानव-वन्यजीव संघर्षाचे प्रमाण लक्षणीय वाढले आहे. दहा वर्षांपूर्वी जंगलात वन्यप्राण्यांची संख्या अधिक असतानाही मानवांवरील हल्लेक्वचितच घडत. जंगली जनावरे गावाजवळ येत असली तरी थेट हल्ल्यांचे प्रकार दुर्मिळ होतेः मात्र अलीकडच्या काळात परिस्थिती बदलली असून वाघ, बिबट्या आणि रानडुकरांचे गावाकडे येणे व नागरिकांवरहल्ले करणे वाढले आहे. स्थानिक नागरिकांच्या मते, वारंवार होणाऱ्या या दुर्घटनांवर केवळ सोशल मीडियावर चर्चा होतेः परंतु दीर्घकालीन उपाययोजना दिसून येत नाहीत. शासन, वरिष्ठ अधिकारी व लोकप्रतिनिधींनी तातडीने बैठका घेऊनठोस कृती आराखडा जाहीर करावा, अशी मागणी होत आहे.मेळघाटातील आदिवासी व गरीब कुटुंबांच्या जिवाची किंमत कवडीमोल नाही. विकास आणि वन्यजीव संवर्धन यामध्ये संतुलन राखत मानवी जीविताला प्राधान्य देणे ही काळाची गरज आहे. वेळेत प्रभावी उपाययोजना न झाल्यास अशा घटना वाढतच राहतील, अशी भीती नागरिकांनी व्यक्त केली आहे.

### तुटपुंजी मदत, ठोस उपाय नाहीत’

हल्ल्यानंतर वनविभागाकडून पीडित कुटुंबांना आर्थिक मदत दिली जातेः मात्र ती अत्यल्प असल्याची भावना स्थानिकांमध्ये आहे. ’कुटुंबातील कर्ता व्यक्ती गमावल्यानंतर काही लाखांची मदत पुरेशी ठरत नाही. पुनर्वसन, कायमस्वरूपी रोजगार आणि सुरक्षिततेची हमी आवश्यक आहे,’ अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

# स्पष्ट वक्ता, रोख ठोक व ठाम मत मांडणारे अजितदादा होते -आ संजय खोडके

## विधानपरिषदेतील शोक प्रस्तावावर आ.संजय खोडके यांनी दिला अजितदादांच्या सहवासातील आठवणींना उजाळा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४मुंबई-** महाराष्ट्र राज्य विधीमंडळाच्या फेब्रुवारी-मार्च २०२६-२७ च्या अर्थसंकल्पिय अधिवेशनाच्या पहिल्या दिवसाच्या कामकाजा दरम्यान विधानपरिषदेच्या सभागृहात शोक प्रस्ताव मांडण्यात आला असता आ.संजय खोडके यांनी दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या कार्य कर्तुत्वाला उजाळा देऊन त्यांच्या समवेत असलेल्या आठवणी सभागृहापुढे व्यक्त केल्यात. आ.संजय खोडके यांनी सभागृहात बोलत असतांना वर्ष १९९९ पासून प्रशासकीय सेवेत असतांना पासून तर आता पर्यंतच्या अजितदादा पवार यांच्या सोबतच्या आपल्या आठवणी मांडत असतांना अनेक आठवणींना त्यांनी उजाळा दिला. एखादा विषय जर आपल्या बुद्धीला पटला नसेल पर त्याविषयीची आपली ठाम भूमिका दादा ठामपणे मांडणारे होते. चुकलं तर चुकलं सांगत होते. ते नेहमी सांगायचे की जे मनात आहे ते सांगितलं पाहिजे. ठाम मत मांडणारे दादा होते. त्यांचे राजकारण आपण जवळून पाहिले आहे. व्यक्तशीरपणा, स्पष्टवक्ता , रोखठोक भूमिका, व जे काम हाती घेतले आहे, ते काम पूर्ण करून सामान्य जनतेचं समाधान करणारे असे दादा होते.



जर एखाद्याने आपल्याला विश्वासाने कुठली गोष्ट सांगितली असेल तर ती आपल्यापर्यंतच ठेवावी, ही त्यांनी दिलेली शिकवण होती. दादांनी काम करत असतांना पक्ष , जात , धर्म कधीच पाहिला नाही, त्यामुळे दादा जनतेत किती रुजले होते हे त्यांच्या निधनानंतर अवघ्या महाराष्ट्राने पाहिले आहे.

आज पहिल्यांदा अजितदादा सभागृहात नसल्याचे दुःख व्यक्त करीत आ.संजय खोडके यांनी दादांना अभिप्रेत असणारे निर्णय राज्यशासन घेतील असा विश्वास देखील आ.संजय खोडके यांनी व्यक्त केला.

# तिवस्याची लेक डॉ. प्राजक्ता थुल यांची एम.डी. (बालरोग तज्ञ) साठी निवड

## गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४तिवसा-** तिवसा येथील एका सामान्य कुटुंबात जन्म घेऊन जिद्द, परिश्रम आणि चिकाटीच्या जोरावर यशाचे शिखर गाठणाऱ्या डॉ. प्राजक्ता अनिता अनिल उर्फ धनराज थुल हिची नाशिक येथील एस.एम.बी.टी. मेडिकल कॉलेज, सायन्स अँड रिसर्च सेंटर येथे एम.डी. पेडियाट्रिक्स (बालरोग तज्ञ) या पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी निवड झाली आहे. तिच्या या उल्लेखनीय यशामुळे तिवसा शहरासह संपूर्ण परिसरात अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.अत्यंत साध्या परिस्थितीतून शिक्षण घेत, अनेक अडचणींवर मात करत डॉ. प्राजक्ता हिने आपल्या गुणवत्तेच्या बळावर हे यश संपादन केले आहे. तिच्या या



यशामुळे केवळ थुल कुटुंबाचाच नाही, तर संपूर्ण तिवसा शहराचा नावलौकिक वाढला असून, हा क्षण गावासाठी प्रेरणादायी ठरला आहे. शिक्षणाच्या जोरावर कोणतीही उंची गाठता येते, हे तिने आपल्या कृतीतून सिद्ध करून दाखवले आहे.डॉ. प्राजक्ता थुल हिच्या या यशामुळे गावातील अनेक मुली व तरुणांना नवी प्रेरणा मिळणार असून, समाजात शिक्षणाविषयी सकारात्मक संदेश पोहोचला आहे. भविष्यात उत्कृष्ट बालरोग तज्ञ बनून समाजाची सेवा करण्याचे तिचे स्वप्न असून, तिच्या या पुढील वाटचालीसाठी सर्व स्तरातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. डॉ. प्राजक्ता थुल हिचे हे यश तिवसा शहराच्या शिरपेचात मानाचा तुरा ठरले आहे. राजकीय व सामाजिक क्षेत्रात सक्रिय असलेल्या कुटुंबाची ही लेक आता वैद्यकीय क्षेत्रातही आपला ठसा उमटवत आहे. तिच्या या उज्ज्वल यशामुळे थुल कुटुंबासह संपूर्ण तिवसा शहराचा मान उंचावला असून सर्व स्तरातून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# अमरावती मनपातील बैठकीवर प्रश्नचिन्ह

## माजी खासदारांच्या अध्यक्षतेबाबत खुलासा करण्याची काँग्रेसची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती**

अमरावती महानगरपालिकेत माजी खासदार किरीट सोमय्या यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीबाबत प्रशासनाकडे खुलासा मागण्यात आला आहे. जन्म व मृत्यू नोंदणी प्रमाणपत्रांतील कथित अनियमिततेच्या पार्श्वभूमीवर ही बैठक आयोजित करण्यात आल्याचे वृत्त प्रसिद्ध झाले होते. या बैठकीस आयुक्त, महापौर तसेच सत्ताधारी पक्षाचे सभागृह नेते उपस्थित होते. पोलिस विभागाचे प्रतिनिधीही उपस्थित असल्याचे सांगितले जाते.या पार्श्वभूमीवर एका निवेदनाद्वारे आयुक्तांना प्रश्न विचारण्यात आले आहेत. महानगरपालिका ही स्थानिक स्वराज्य संस्था असून, सध्या कोणतेही अधिकृत पद नसलेल्या माजी खासदारांना अध्यक्षस्थानी



बसवून बैठक घेण्यास कायदेशीर तरतूद आहे का, याबाबत स्पष्टीकरण मागण्यात आले आहे. तसेच, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ अंतर्गत अशा बैठकीसाठी अधिकृत अध्यक्षतेचा अधिकार कोणाला आहे, हे स्पष्ट करावे, अशी मागणी करण्यात आली आहे.याशिवाय, बैठकीस उपमहापौर, विरोधी पक्षनेते आणि इतर पक्षांचे गटनेते यांना निमंत्रण का देण्यात आले नाही, असा सवालही उपस्थित करण्यात आला आहे. केवळ एका पक्षाशी संबंधित व्यक्तीच्या उपस्थितीत संवेदनशील प्रशासकीय विषयावर बैठक घेणे योग्य ठरते का, असा मुद्दाही उपस्थित केला आहे.तसेच, भविष्यात इतर पक्षातील नेते जसे की यशोमती ठाकूर,डॉ.सुनील देशमुखयांनी अशा प्रकारची बैठक घेतल्यास प्रशासनाची भूमिका काय असेल, याबाबतही स्पष्टता मागण्यात आली आहे.या सर्व मुद्द्यांवर लेखी खुलासा देण्याची मागणी करण्यात आली असून, मनपाच्या प्रशासकीय प्रक्रियेतील पारदर्शकता व सर्वसमावेशकतेबाबत जनतेत चर्चा रंगली आहे.

# महाविकास आघाडीच्या नेत्यांची ओरड

## मिटिंगसाठी की मिटिंगमधील विषयासाठी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती,** भाजपा नेते किरीट सोमय्या यांनी अमरावती मनपात घेतल्याने काँग्रेसच्या आणि महाविकास आघाडीच्या पोटदुखी होण्याचे कारण नाही. किरीट सोमय्या यांनी ज्या विषयाला घेऊन मिटिग घेतली तो विषय अत्यंत महत्वाचा असून अनेक बोगस आणि चुकीचे जन्माचे दाखल्याचा विषय आहे. अशा तक्रारी केवळ अमरावती मध्ये नाही तर महाराष्ट्रातील अनेक ठिकाणी केल्या आहे. काही ठिकाणी यामध्ये तथ्य समोर आल्याने चौकशी चे आदेश झाली आणि एफ आय आर दाखल करण्यात आले, या विषयाची माहिती घेणे त्या बाबत महापौरांनी अधिकाऱ्यांना बोलावणे गैर कसे होईल. महाविकास आघाडीच्या नेत्यांना होणारी पोटदुखी मीटिंग बाबत आहे की मीटिंग मधील विषया बाबत आहे? हे सर्व जनतेला माहिती आहे.



# पं. हरिप्रसाद चौरसिया, उस्ताद अमजद अली खान यांना पुरस्कार

## पहिल्या उस्ताद ज़ाकीर हुसैन एक्सलन्स पुरस्काराने सन्मानित

## जावेद अख्तर करणार प्रदान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४पुणे-** पुण्यातील तालचक्र ट्रस्टतर्फे कला क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या मान्यवरांना ’उस्ताद ज़ाकीर हुसैन एक्सलन्स पुरस्कार’ प्रदान करण्यात येणार आहेत. ज्येष्ठ बासरीवादक पद्मविभूषण पं. हरिप्रसाद चौरसिया यांना २०२५ चा, तर ज्येष्ठ सरोदवादक पद्मविभूषण उस्ताद अमजद अली खान यांना २०२६ चा हा पुरस्कार जाहीर झाला आहे.

पद्मविभूषण उस्ताद ज़ाकीर हुसैन यांच्या ७५ व्या जयंतीचे औचित्य साधत, येत्या ९ मार्च रोजी कोथरूड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात सायंकाळी ७ वाजता एका विशेष कार्यक्रमात हे पुरस्कार प्रदान केले जातील. या पुरस्काराचे स्वरूप रुपये १ लाख रोख आणि मानचिन्ह असे आहे.

प्रसिद्ध गीतकार व लेखक जावेद अख्तर यांच्या हस्ते हे पुरस्कार दिले जातील. सुप्रसिद्ध तबलावादक आणि तालचक्र ट्रस्टचे विश्वस्त पद्मश्री पं. विजय घाटे यांनी ही माहिती दिली.

पं. घाटे यांनी सांगितले की, गेली १२ वर्षे तालवाद्यांना समर्पित ’तालचक्र संगीत महोत्सव’ आयोजित करत आहोत. माझे प्रेरणास्थान असलेल्या तालसम्राट उस्ताद ज़ाकीर हुसैन यांच्या स्मृतीमध्ये एक चांगला उपक्रम राबवावा, या विचारातूनच या पुरस्काराची संकल्पना पुढे आली.

उस्ताद ज़ाकीर हुसैन यांच्या चतुरस्त्र व्यक्तिमत्त्वाचा विचार करता, या पुरस्काराची व्याप्ती





केवळ संगीत क्षेत्रापुरती मर्यादित न ठेवता, येत्या काळात कला क्षेत्रातील विविध शाखांमध्ये मोठे योगदान देणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करण्याचा मानस आहे, असेही पं. घाटे यांनी स्पष्ट केले.

पुरस्कार वितरण समारंभात एक विशेष सांगीतिक कार्यक्रम सादर केला जाईल. १९९८ साली आलेल्या सई परांजपे दिग्दर्शित ’साज’ या चित्रपटातील गोरख कल्याण रागावर आधारित ’फिर भोर भाई जागा मधुबन...’ या गाण्यावर या कार्यक्रमाची संकल्पना आधारित आहे. हे गाणे जावेद अख्तर यांनी लिहिले असून, उस्ताद ज़ाकीर हुसैन यांनी संगीतबद्ध केले होते आणि विदुषी देवकी पंडित यांनी गायले होते. या सांगीतिक कार्यक्रमात अमर ओक (बासरी), ताकाहीरो अराई (संतूर), कृष्णा साळुंखे व ओंकार दळवी (पखवाज), नितीन सातव (जेंबे), सुरंजन खंडाळकर (गायन), यशवंत थिट्टे (संवादिनी), शीतल कोलवालकर (कथक), सागर पटोकर (साईड रिदम) आदी कलाकार सहभागी होतील. कार्यक्रमाच्या शेवटी स्वतः विदुषी देवकी पंडित हे गाणे रसिकांपुढे सादर करतील. विशेष म्हणजे, या कार्यक्रमात तबल्याचा अंतर्भाव करण्यात आलेला नाही. उस्ताद ज़ाकीर हुसैन यांच्यासारखे तबलावादन कोणीच करू शकत नाही, ही भावना अधोरेखित करण्याचा हा एक प्रयत्न आहे. त्यामुळे त्यांच्या जयंतीला सादर होणाऱ्या या कार्यक्रमात तबला नसेल.

# बारशाच्या कार्यक्रमातून १.९२ लाखांचे दागिने व रोख लंपास

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती-** मोर्शी येथील परशुराम मंगल कार्यालयात बारशाचा कार्यक्रम सुरू होता. या कार्यक्रमात नातेवाईकांकडून लहान बाळाला भेट स्वरूपात आलेले दागिने व रोख रक्कम असा सुमारे एक लाख ९२ हजार रुपयांचा ऐवज अज्ञात चोरट्याने लंपास केला. ही घटना २१ फेब्रुवारीला घडली असून, या प्रकरणी २२ फेब्रुवारीला गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भूषण हरिहर देशमुख (४६, रा. मोर्शी) यांनी या प्रकरणात तक्रार दिली आहे. तक्रारीनुसार, त्यांच्या भाच्याच्या बारशाचा कार्यक्रम २१ फेब्रुवारीला परशुराम कार्यालयात सुरू होता. कार्यक्रमादरम्यान नातेवाईकांनी बाळाला भेट दिलेले एकूण सहा ग्रॅम सोन्याचे दागिने (किंमत सुमारे ९० हजार रुपये), तसेच २० ग्रॅम चांदीचे दागिने आणि एक लाख रुपये रोख असा ऐवज एका पर्समध्ये ठेवला होता. ही पर्स खुर्चीवर ठेवली होती. कार्यक्रमा दरम्यान अज्ञात चोरट्याने खुर्चीवर असलेले दागिने व रोख रक्कम असलेली ही पर्स लंपास केली. चोरी झाल्याचे लक्षात येताच भूषण देशमुख यांनी मोर्शी पोलिसांत तक्रार दिली. पोलिसांनी चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# कंजोली येथे अपघातग्रस्ताचा सामूहिक अंतिम संस्कार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४ मेळघाट** धारणी तालुक्यातील राणीघाटामध्ये रविवारी रात्री कंजोली येथे नुकत्याच घडलेल्या अपघातात मृत्यू झालेल्या व्यक्तीचा सामूहिक अंतिम संस्कार गावकऱ्यांच्या उपस्थितीत अत्यंत शोकाकुल वातावरणात पार पडला. या दुर्दैवी घटनेने संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.



अंतिम संस्कारावेळी गावातील तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी मिळून मृतका श्रद्धांजली अर्पण केली आणि कुटुंबीयांना भावनिक आधार दिला. स्थानिक प्रशासनानेही आवश्यक ती मदत आणि सुविधा उपलब्ध करून दिल्या.याप्रसंगी खा, बळवंत वानखडे हेही उपस्थित राहिले. त्यांनी मृतकाच्या कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले, तसेच अपघाताची गंभीरता लक्षात घेऊन संबंधित विभागानी याबाबत सखोल चौकशी करून भविष्यातअशा घटना टाळण्यासाठी उपाययोजना करण्याची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली.खासदारांनी प्रशासनाला त्वरित मदतकार्य करण्याच्या सूचना दिल्या असून, मेळघाटमध्ये झालेल्या अपघातातील वाहनचालकांवर सक्त कारवाई करावी, अशा सूचना जिल्हाधिकारी येरेकर यांनी जिल्हा पोलिस अधीक्षक विशाल आनंद यांना दिल्या. शासकीय पातळीवर मिळणाऱ्या आर्थिक साहाय्या बाबतही लवकर निर्णय होईल, असे आश्वासन त्यांनी उपस्थितांना दिले. गावातील नागरिकांनी प्रशासनाकडून रस्ते सुरक्षितता, वाहतूक नियंत्रण आणि अपघात प्रतिबंधक उपाययोजनांची मागणी याप्रसंगी केली आहे.

# अमरावतीत शासकीय कर्मचाऱ्यांचे कामबंद आंदोलन सुरू

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२४अमरावती :**

अधिकार रक्षणासाठी सज्ज, कर्मचाऱ्यांच्या प्रगतीसाठी कटीबद्ध या घोषवाक्याखाली जय महाराष्ट्र शासकीय निमशासकीय अधिकारी व कर्मचारी संघटना, जिल्हा शाखा अमरावतीच्या वतीने सोमवार (दि. २३ फेब्रुवारी २०२६) पासून कामबंद आंदोलनास सुरुवात करण्यात आली. पंचवटी चौक ते जिल्हाधिकारी कार्यालय मार्गावरील सिंचन सेवा भवन परिसरात जलसंपदा, मृद व जलसंधारण व सार्वजनिक बांधकाम विभागातील कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले.

राज्य कार्यकारिणी अध्यक्ष अशोक विठ्ठलराव डहाळे यांच्या नेतृत्वाखाली राज्यभर हे आंदोलन छेडण्यात आले आहे.

चौथ्या वेतन आयोगापासूनची वेतनत्रुटी दूर करणे, जुनी पेन्शन योजना लागू करणे, पदोन्नती साखळी कमी करणे आदी पाच प्रमुख मागण्यांसाठी हा एल्गार पुकारण्यात आला. असहकार, कामबंद व बेमुदत अशा टप्प्यांत आंदोलन होणार असून मागण्या मान्य होईपर्यंत लढा सुरू ठेवण्याचा इशारा संघटनेने दिला.

### एचएसआरपी नंबर प्लेट प्रकरण.....

# मुदत उलटून निम्मी वाहने नियमबाह्य रस्त्यावर कधी होणार कारवाई ?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती**

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांनंतर राज्यातील सर्व वाहनांना उच्च सुरक्षा नंबर पाटी (एचएसआरपी) बसवणे परिवहन खात्याने अनिवार्य केले होते. यासाठी ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत मुदत होती. पण मुदत उलटूनही निम्याहून अधिक वाहनांना ही पाटी लागली नाही. नवी पाटी न लावताच ही वाहने रस्त्यावर धावत आहेत. त्यांच्यावर कारवाई केली जात नसल्याने परिवहन खात्याच्या कामावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

राज्यात दुचाकी, चारचाकी, जड आणि इतरही सर्व प्रकारची सुमारे २.१० कोटी वाहने आहेत. त्यांना एचएसआरपी पाटी बसवणे बंधनकारक आहे. परिवहन खात्याने यासाठी रोझमर्टा सेफ्टी सिस्टिम्स लिमिटेड, रिअल मॅझॉन इंडिया लिमिटेड आणि एफटीए एचएसआरपी सोल्यूशन्स प्रा.लि. या कंपन्यांना काम दिले. त्यासाठी दरही निश्चित करून दिले होते.वाहनांना या पाट्या लावल्या नाहीत तर दंडात्मक कारवाईचा इशाराही परिवहन खात्याने दिला.होता. त्यानंतरही निम्याही वाहनांना या पाट्या लागलेल्या




नाहीत, असे निदर्शनास आले आहे.राज्यात ३ फेब्रुवारी २०२६पर्यंत १ कोटी २ लाख २८ हजार ३७३ वाहनांनी पाटीसाठी नोंदणी केली. त्यापैकी ८८ लाख ३० हजार २५७ वाहनां वर प्रत्यक्ष नवीन पाटी लावण्यात आली.एकूण वाहनसंख्येच्या तुलनेत नोंदणीचे प्रमाण सुमारे ४९ टक्क्यांवर, तर प्रत्यक्ष पाटी लावण्यचे प्रमाण केवळ ४२ टक्क्यांवरच थांबले आहे. याचाच अर्थ राज्यातील अजूनही बहुसंख्य वाहनांना जुन्या अथवा अप्रमाणित क्रमांकाच्याच पाट्या असून ते रस्त्यावर धावत आहेत. अंतिम मुदतीनंतर व्यापक तपासणी मोहीम राबवण्याची घोषणा करण्यात आली होती. मात्र शहरांपासून ग्रामीण भागापर्यंत कुठेही कारवाई होतांना दिसत नाही.

# भंडारज फाट्यावर एसटी कार भीषण अपघात

## दोघांचा जागीच मृत्यू, दोघे जखमी

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२४ अमरावती :** जिल्ह्यातील भंडारज फाटा येथे आज दुपारी एसटी बस आणि कार यांच्यात झालेल्या भीषण अपघातात दोघांचा जागीच मृत्यू झाला, तर दोन जण गंभीर जखमी झाले. प्राथमिक माहितीनुसार, बस चालकाचे नियंत्रण सुटल्याने बस समोरून येणाऱ्या कारवर आदळली. धडक इतकी जोरदार होती की कारचा पुढील भाग पूर्णपणे चुराडा झाला.

अपघातानंतर परिसरात एकच खळबळ उडाली. स्थानिक नागरिकांनी तातडीने मदतकार्य सुरू करत जखमींना बाहेर काढले. जखमींवर अंजनगाव सुर्जी येथील ग्रामीण रुग्णालयात प्राथमिक उपचार सुरू आहेत. मृतांची ओळख





पटविण्याचे काम सुरू असून पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा केला आहे. अपघाताचे नेमके कारण व पुढील तपास सुरू असल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली.-

# महापालिकेत लोकशाहीची पायमल्ली!

## महिला आयुक्तांच्या समोरच नगरसेवक चंदू खेडकरांची तक्रारदाराला शिवीगाळ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती**

महानगरपालिकेच्या जनसंवाद व समस्या निवारण कार्यक्रमात आज एक संतापजनक प्रकार उघडकीस आला. रहाटगाव प्रभागातील अतिक्रमणाची तक्रार घेऊन आलेल्या नागरिकाला, नवनियुक्त नगरसेवक चंदू खेडकर यांनी चक्क महिला आयुक्त सौम्या शर्मा यांच्या उपस्थितीतच अश्लील शिवीगाळ केली. या प्रकारामुळे महापालिकेत खळबळ उडाली असून लोकप्रतिनिधींच्या वर्तणुकीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात



आहे.मिळालेल्या माहितीनुसार, महापालिकेत जनतेच्या समस्या सोडवण्यासाठी 'जनसंवाद' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी रहाटगाव प्रभागातील अतिक्रमणाबाबत तक्रार घेऊन काही नागरिक आले होते. या तक्रारीमुळे संतापलेल्या नगरसेवक चंदू खेडकर यांचा संयम सुटला. त्यांनी तक्रारदाराशी हुज्जत घालत अत्यंत खालच्या पातळीवर जाऊन शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. विशेष म्हणजे, यावेळी खुद्द मनपा आयुक्त सौम्या शर्मा उपस्थित होत्या. आयुक्तांसमोरच सुरू असलेला हा राडा पाहून उपस्थित अधिकारी आणि नागरिक अवाक झाले.

पहिल्याच निवडीनंतर सत्तेची मस्ती?चंदू खेडकर हे पहिल्यांदाच नगरसेवक म्हणून निवडून आले आहेत. मात्र, पहिल्याच कार्यकाळात जनतेच्या समस्या ऐकून घेण्याऐवजी, तक्रार करणाऱ्यावरच धावून जाण्याच्या त्यांच्या वृत्तीचा सर्वत्र निषेध होत आहे. महिला अधिकाऱ्याचा सन्मान न राखता आणि पदाची प्रतिष्ठा विसरून केलेल्या या कृत्यामुळे राजकीय वर्तुळातून त्यांच्यावर टीकेची झोड उठत आहे.

# अमरावती मनपाचा जनसंवाद व कर सुनावणी कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात नागरिकांच्या तक्रारींवर थेट सुनावणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती**

नागरिकांच्या तक्रारी, समस्या व सूचनांचे तातडीने निराकरण करण्यासोबतच प्रलंबित कर प्रकरणांवर थेट सुनावणी घेण्यासाठी अमरावती महानगरपालिका तर्फे आयोजित 'जनसंवाद, समस्या निवारण व कर प्रकरणांची सुनावणी' या विशेष कार्यक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.हा कार्यक्रम डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह येथे पार पडला. महानगरपालिकेच्या विविध विभागांशी संबंधित प्रश्न, तक्रारी व सूचना यावर संबंधित अधिकाऱ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधण्याची संधी नागरिकांना उपलब्ध करून देण्यात आली. यावेळी पाणीपुरवठा, स्वच्छता, बांधकाम परवाने, मालमत्ता कर, अतिक्रमण, रस्ते दुरुस्ती आदी विषयांवरील अनेक प्रकरणांवर सविस्तर चर्चा करण्यात



आली.विशेषतः प्रलंबित मालमत्ता कर प्रकरणांवर सुनावणी घेऊन संबंधित नागरिकांना मार्गदर्शन करण्यात आले. काही प्रकरणांमध्ये तत्काळ निर्णय घेण्यात आले, तर जटिल प्रकरणांसाठी पुढील कार्यवाहीसंदर्भात स्पष्ट सूचना देण्यात आल्या. कर विभागातील अधिकाऱ्यांनी थकबाकी, दंड, हप्ते पद्धती व सवलतींबाबत नागरिकांना माहिती दिली.कार्यक्रमास महानगरपालिकेचे सर्व संबंधित विभागप्रमुख व अधिकारी उपस्थित होते. नागरिकांनी आवश्यक कागदपत्रांसह हजर राहून आपल्या तक्रारी मांडल्या. थेट संवादाच्या या उपक्रमामुळे प्रशासकीय प्रक्रियेला गती मिळत असल्याचे मत अनेक नागरिकांनी व्यक्त केले.महानगरपालिकेच्या वतीने नागरिकांना आवाहन करण्यात आले की, अशा जनसंवाद कार्यक्रमांचा लाभ घेऊन आपल्या समस्या अधिकृत मार्गाने मांडाव्यात. पारदर्शक व उत्तरदायी प्रशासनाच्या दिशेने हा उपक्रम महत्त्वाचा टप्पा ठरत असून, भविष्यातही अशा कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली.नागरिक-प्रशासन संवाद अधिक प्रभावी करण्यासाठी आणि प्रलंबित कर प्रकरणांना गती देण्यासाठी राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे मनपा प्रशासनाबद्दल सकारात्मक वातावरण निर्माण झाल्याचे चित्र दिसून आले.

# संच मान्यतेला 'तारीख पे तारीख'

## ६१ शाळांचे प्रस्ताव प्रलंबित

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती :**

जिल्ह्यात संच मान्यतेच्या प्रक्रियेला होत असलेल्या विलंबामुळे शिक्षण व्यवस्थेत गोंधळ निर्माण झाला आहे. शासनस्तरावर ६१ शाळांचे प्रारूप प्रस्ताव अद्याप प्रलंबित असल्याने अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन आणि भरती प्रक्रिया ठप्प झाली आहे. फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात संच मान्यता पूर्ण करून २३ फेब्रुवारीला समायोजन करण्याचे




नियोजन होते. मात्र विलंबामुळे ही तारीख पुढे ढकलून २६ फेब्रुवारी निश्चित करण्यात आली आहे.गत दोन वर्षांपासून संच मान्यतेचा विषय रखडलेला असून सप्टेंबरमध्ये पूर्ण होणारी प्रक्रिया तांत्रिक व धोरणात्मक कारणांमुळे लांबत आहे. विद्यार्थ्यांच्या उपस्थितीवर आधारित मान्यता द्यावी, अशी संघटनांची मागणी असताना शासनाने 'आधारवेस' पद्धतीला प्राधान्य दिल्याने वाद निर्माण झाला. परिणामी अनेक शाळांत शिक्षकांची कमतरता तर काही ठिकाणी अतिरिक्त शिक्षकांची समस्या निर्माण झाली आहे. या विलंबाचा शैक्षणिक गुणवत्तेवर परिणाम होण्याची भीती व्यक्त होत असून प्रशासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी जोर धरत आहे.

# सरपंचाचा अपमान; लोकशाहीवर हल्ल्याचा आरोप

## जामगाव खडका प्रकरणी बेनोडा शहीद पोलीस ठाण्यावर संतप्त मोर्चा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४वरुड** तालुक्यातील जामगाव खडका येथे विद्यमान सरपंच सौ. लिलाताई संजय कुमरे यांना कथितपणे अश्लील व अपमानास्पद भाषेत शिवीगाळ करून त्यांच्यासमोर धनादेश (चेक) फाडल्याच्या घटनेने परिसरात तीव्र संतापाची लाट उसळली आहे. या घटनेच्या निषेधार्थ वरुड तालुक्यातील सरपंच संघटना, बिरसा क्रांती दल तसेच जामगाव खडका व आसपासच्या गावांतील नागरिकांनी एकत्र येत बेनोडा शहीद पोलीस ठाणे येथे भव्य मोर्चा काढला.माजी सरपंच मनोज पेलागडे यांच्यावर या प्रकरणात आरोप करण्यात आले असून, आंदोलकांनी या प्रकाराला केवळ वैयक्तिक वाद न मानता लोकशाही व्यवस्थेवरील आणि महिला लोकप्रतिनिधीच्या सन्मानावरील हल्ला असल्याचा ठाम आरोप केला. मोर्चादरम्यान



आंदोलकांनी ठाणेदार विवेक देशमुख यांना सविस्तर निवेदन सादर केले. निवेदनात सरपंच पदाचा जाहीर अपमान झाल्याने ग्रामपंचायत व्यवस्थेची प्रतिष्ठा धुळीस मिळाल्याची भावना व्यक्त करण्यात आली.आंदोलकांनी आरोपीविरुद्ध तातडीने गुन्हा नोंदवून कठोर कारवाई करण्याची मागणी केली. भविष्यात कोणत्याही लोकप्रतिनिधीवर अशा प्रकारचे कृत्य करण्याचे धाडस कुणीही करणार नाही, असा संदेश प्रशासनाने द्यावा, अशीही भूमिका त्यांनी मांडली. मोर्चात महिलांची विशेष उपस्थिती लक्षवेधी ठरली. महिला सक्षमीकरण केवळ घोषणांपुरते मर्यादित न राहता प्रत्यक्ष कृतीतून दिसले पाहिजे, अशी ठाम मागणी महिला कार्यकर्त्यांनी केली.ठाणेदार विवेक देशमुख यांनी आंदोलकांना आश्वस्त करत सांगितले की, प्रकरणाची सखोल चौकशी सुरू आहे आणि कायद्यानुसार दोषींवर कठोर कारवाई केली जाईल. कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवत पीडितेला न्याय मिळवून देण्यासाठी पोलीस कटिबद्ध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.या आंदोलनाचे नेतृत्व कमलनारायण उईके यांनी केले. यावेळी महादेव माकोडे, अक्षय जाऊरकर, विष्णू गीद, मंगेश गावंडे, संदीप उईके, सुनील चौधरी, महादेव गावंडे, दिगंबर वानखडे,आदींसह शेकडो महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या.

# डॉ.पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालयात तरुणाईचा जल्लोष

## स्नेहसंमेलनात विविध कला व सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी

### स्नेहसंमेलन हे कलागुणांना वाव देणारे व्यासपीठ-विलास इंगोले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती**

उद्या घेणे श्री शिवाजी शिक्षण संस्था द्वारा संचालित डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय येथे वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात पार पडले. स्नेहसंमेलन हे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणारे व्यासपीठआहे असे प्रतिपादन मनपा विरोधी पक्षनेते विलास इंगोले यांनी केले.डॉ.पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय येथे आयोजित स्नेहसंमेलनाच्या समारोपीय कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते.या कार्यक्रमात विविध सांस्कृतिक उपक्रमांची रंगतदार मेजवानी पाहायला मिळाली.कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून विलास भाऊ इंगोले (अमरावती महानगरपालिकेचे विरोधी पक्ष नेते) तसेच ड.सुनील देशमुख (बारा असोसिएशनचे अध्यक्ष),प्राचार्य ढोबळे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. वर्षा देशमुख ह्या होत्या.विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या नृत्य, गीत, नाट्यछटा, एकांकिका आणि लोककलेच्या सादरीकरणांनी उपस्थितांची मने जिंकली. यावेळी प्रमुख अतिथी विलास इंगोले आणि सुनील देशमुख यांनी विद्यार्थ्यांच्या उत्साहाचे व आयोजन कौशल्याचे कौतुक करत शिक्षणाबरोबरच सांस्कृतिक उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते विविध स्पर्धा आणि उपक्रमात यशस्वी ठरलेल्या विद्यार्थ्यांचे विविध पारितोषिके देऊन त्यांना गौरविण्यात आले. महाविद्यालयाच्या वतीने अतिथींचा शाल,श्रीफळ व



पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सिद्धार्थ भोयर,जाज्ी ओबेरॉय, व राधिका ठाकरे यांनी प्रभावीपणे केले तर आभार प्रदर्शन प्रफुल्ल घवळे यांनी केले.स्नेहसंमेलनामुळे महाविद्यालय परिसरात उत्साहाचे आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरचा आत्मविश्वास आणि आनंद हा कार्यक्रमाच्या यशाची साक्ष देणारा ठरला.कार्यक्रमाच्या यशस्वी ते करिता सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

# मराठी शाळा बंदी विरोधात २५ फेब्रुवारीला

## जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२४अमरावती :** ऑल इंडिया स्टुडंट्स फेडरेशन (-खडऋ), जिल्हा अमरावतीच्या वतीने कमी पटसंख्येच्या नावाखाली मराठी शाळा बंद करण्याच्या निर्णयाविरोधात २५ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे.ऑल इंडिया स्टुडंट्स फेडरेशन च्या नेतृत्वाखाली डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक (ईर्विन चौक) येथून जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत हा मोर्चा निघणार आहे.शिक्षण हक्क कायद्यानुसार विद्यार्थ्यांच्या घराजवळ शाळा असणे बंधनकारक असतानाही २० पेक्षा कमी पटसंख्येच्या शाळा बंद करण्याचा निर्णय घेतला जात असल्याचा आरोप संघटनेने केला



आहे. शाळा संकुल रचनेमुळे ग्रामीण व आदिवासी भागातील विद्यार्थ्यांचे शिक्षण धोक्यात येईल, तसेच हजारो शिक्षक अतिरिक्त ठरतील, असेही निवेदनात नमूद आहे. अमरावती जिल्ह्यातील २२५ शाळा बंद होण्याच्या मार्गावर असल्याचा दावा करण्यात आला.शाळा बंदीचा निर्णय रद्द करणे, शिक्षक भरती तातडीने करणे, दत्तक शाळा योजना रद्द करणे, ठढए अंतर्गत सुविधा देणे आदी १३ प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत. या मोर्चात पालक, विद्यार्थी, शिक्षक व शिक्षणप्रेमींनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# IRB विश्रामस्थळी खून प्रकरणाचा छडा

## राजकोटचे दोन आरोपी कारसह अटकेत



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४ तिवसा** अमरावती जिल्ह्यातील तिवसा पोलीस ठाणे हद्दीतील एनएच-५३ वरील खठइ ट्रक विश्रामस्थळी झालेल्या खून प्रकरणाचा स्थानिक गुन्हे शाखेने छडा लावला असून राजकोट (गुजरात) येथील दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे. दि. २० फेब्रुवारी रोजी पहाटे चौकीदार जानराव ठाकरे यांना विश्रामस्थळी विमल सतिषभाई आग्रावत (२२, रा. राजकोट) हा रक्ताच्या थारोळ्यात आढळला. घटनास्थळी धारदार चाकू सापडल्याने खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला.तपासादरम्यान पोलीस पथक राजकोट येथे रवाना झाले. गुप्त माहितीच्या आधारे माहिर माजीदभाई सोलंकी (२२) व राज वहिदभाई चव्हाण (२२) यांना ऋ॥०३झऊ९११ क्रमांकाच्या बलेनो कारसह ताब्यात घेण्यात आले. चौकशीत पॉक्सो प्रकरणातील वाद, पैशांची मागणी व जीवे मारण्याच्या धमक्यांमुळे सूडातून खून केल्याची कबुली आरोपींनी दिली.दोन्ही आरोपींना पुढील कारवाईसाठी तिवसा पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. ही कारवाई अमरावती ग्रामीण पोलीस यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा व तिवसा पोलीसांनी संयुक्तरीत्या पार पाडली.


आता आपल्या मोबाईल वरच वाचा
राज्यासह जिल्ह्यातील महत्वाच्या घडामोडी
दररोज रात्री 8 वाजता वाचा
निवांत!!
सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
राजकीय,सामाजिक,कृषी,शैक्षणिक,क्रीडा,क्राईम
विश्वातील सर्व घडामोडी वाचा आता आमच्या सोबत